# अजुनही...

स्वप्ना कुलकर्णी थिटे

BlueRose ONE.com
Stories Matter
NewDelhi • London

**BLUEROSE PUBLISHERS**
India | U. K.

Copyright © Swapna Kulkarni Thite 2025

All rights reserved by author. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author. Although every precaution has been taken to verify the accuracy of the information contained herein, the publisher assume no responsibility for any errors or omissions. No liability is assumed for damages that may result from the use of information contained within.

BlueRose Publishers takes no responsibility for any damages, losses, or liabilities that may arise from the use or misuse of the information, products, or services provided in this publication.

For permissions requests or inquiries regarding this publication, please contact:

BLUEROSE PUBLISHERS
www. BlueRoseONE. com
info@bluerosepublishers. com
+91 8882 898 898
+4407342408967

ISBN: 978-93-7139-839-8

Cover design: Daksh
Typesetting: Tanya Raj Upadhyay

First Edition: July 2025

त्या कर्त्या करवित्या जगन्नियंत्याला

हे एक छोटेसे समर्पण ...

# प्रस्तावना

खूप दिवसांपासून लिहिण्याचे मनात होते .काहीं घटना अपल्याभवती घडतात , काही रोजच्या बघण्यातल्या असतात ...त्यातून आपण काही शिकत असतो .काही आपल्याला पटत नाहीत ...पण जेव्हा एक सर्वसामान्य स्त्री किंवा एखादा पुरुष जेव्हा समाजाकडे , इथल्या चाली रीतींकडे डोळे उघडुन बघायचा प्रयत्न करतो ...तेव्हा असे जाणवते ..की अजूनही ....खूप पुढे जाऊ शकतो ...अजूनही खूप करू शकतो ...अजूनही जून्यातून नवीन खूप काही शिकण्यासारखे आहे ,की जे अजूनही आपल्याला समजलेच नाही ....अजूनही खूप चुका टाळता येऊ शकतात....अजूनही खूप मोठा पल्ला गाठायचा आहे...

एक स्त्री म्हणून , पुरुष म्हणून ..आणि त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे माणूस म्हणून ...आपल्या दैनंदिन जीवनात जरी आपण सजग राहिलो तरी खूप काही सुचते ..खूप काही शिकता येते ..खूप काही मिळवता येते...असे सजग जीवन आपल्याला समृद्ध करते ,समाधान देते .

म्हणुनच या पुस्तकाचे नाव अजूनही....

जेव्हा माणूस भोवतालच्या समाजापेक्षा थोडा वेगळा विचार करतो तेव्हा त्याला विरोध पत्करुन च पुढे जावे लागते .पण ठोस

आत्मविशवासपूर्वक पाऊल उचलले आणि कोणाचाही अपमान केला नाही किंवा कोणालाही कमी लेखले नाही तर संघर्ष थोडा कमी करावा लागतो आणि समोरच्याला विचार करायला भाग पाडू शकतो , असे मला वाटते . या पुस्तकामध्ये असलेल्या काही कथांमध्ये हेच मांडायचा प्रयत्न केला आहे . आणि काही कथा सहजच सुचल्या ....

या सर्वव्यापी परमेश्वराला माझे ही प्रथम अभिव्यक्ती नम्रता पूर्वक समर्पित .

❀❀❀

# अनुक्रमणिका

ऋतुशांत ........................................................................ 1

अळू वडी ........................................................................ 49

3BHK ( three bedroom kitchen ) ............................. 54

पिरिअड्स ( पाळी ) ........................................................ 61

वर्जिन. (virgin ) ......................................................... 73

दिवाळी चित्राच्या घरची.............................................. 102

# ऋतुशांत

ही कथा आपल्या कथेतील पात्रच पुढे नेणार आहे. त्यामुळे पात्र परिचय करून देत आहे

खर म्हणजे कोणीच तस खूप वाईट किंवा खूप चांगल नसतं ना ? त्याचप्रमाणे आपल्या गोष्टी मधील सर्व पात्रे ग्रे शेड ची आहेत. प्रत्येकाच्या विचारसरणी मागे त्यांचा भूतकाळ त्यांना मिळालेले संस्कार आहेत आणि त्यातून होणारा संघर्ष आणि त्यावर त्यांनी आपापल्या परीने काढलेले तोडगे.... यांची ही कथा आहे.

गोपिकाबाई - सासूबाई

योगिता - मोठी सूनबाई

अजय - योगिताचा नवरा, गोपिकाबाई यांचा मोठा मुलगा

प्रिया - धाकटी सून

रोहन - प्रियाचा नवरा, गोपिकाबाई यांचा धाकटा मुलगा.

गोपीका

परवाच्या लग्नाची गडबड जरा कमी झाली, आणि आज जाणवतंय शरीर अगदी थकून गेले आहे. धाकट्या मुलाचे लग्न म्हणजे काय सोपी गोष्ट ? घरातलं शेवटचं कार्य, ते व्यवस्थित च झाले पाहिजे

ना, नातेवाईकांना पण भावले पाहिजे ना... पण निभावलं बाई सार व्यवस्थित..... अजयने मोठ्या भावाची जबाबदारी तर उत्तमच पार पाडली. पण आर्थिक जबाबदाऱ्या मात्र हेच पार पाडून गेले हो.... सगळ्यांसाठी सगळे करून च गेले..... पण एवढ्या लवकर असे घडेल असे वाटले नव्हते, तशी प्रकृती चांगली होती त्यांची पण एवढा जबरदस्त अटॅक आला की जागीच गेले.... हमम... आणि मी विधवा झाले.... माझा कुंकवाचा आधारच गेला जणू. तशी मी आत्ता पण घर चालवायला समर्थ आहेच. अजय योगिता ही नात्यांची जबाबदारी ओळखून आहेत. आणि घरात मोठे म्हटल्यावर करणं आलंच की... दोघेही देव - देवक अगदी काटेकोर पणे पाळतात हो... योगिता पण सगळं विचारून, समजावून घेते आणि श्रद्धेनं करते सगळं... हो कुठे चुकायला नको आपल्याकडून.... मी सांगितलेले व्रत वैकल्ये अगदी काटेकोरपणे पाळले जातात आजपर्यंत या घरात... आता ही प्रिया कशी आहे काय माहिती ? रोहन ने स्वतःच पसंत केली... नशीब आपल्याच जातीतली केली ते... नाहीतर... मी तर कधीच मान्य केलेच नसते.... आपल्या रितीरिवाज, परंपरा पुढे न्यायच्या म्हणजे असं करून चालणारच नाही... पण तरी कळले प्रियाबद्दल तेव्हा मीच घाई केली लग्नाची... हो... लग्न होण्याआधीच फिरणे म्हणजे माझ्याच डोक्याला ताप....

पण लग्न मात्र अगदी छान झाले हो ! आता मुलीकडचे जरा जास्तच सुधारक का काय ते वाटत आहेत... रोजची पूजा पण सोवळ्यात करत नाही. शिवाशिव पाळत नाहीत... पण ते त्यांच्या घरी....

आपल्या इथे सगळे रितीरिवाज व्यवस्थित च पाळले गेले पाहिजे... असाच दम भरला मी रोहनला.... आणि त्याने खात्री दिली प्रियाबद्दल.. जाऊ दे... मुलगी आहे पण अगदी नक्षत्रा सारखी... सुंदर, आणि सालस... माझ्या अगदी नेहमीं वाकून पाया पडते हो... मग कशाला उगीच रोहनला दुखवा... होऊ दे त्याच्या पसंतीच्या मुलीशी लग्न...

सुखी ठेव रे देवा आम्हा सगळ्यांना...

किती वाजले ? अरे देवा आत्ताशी साडेचार वाजले... तासाभराने उठावे आणि दिनक्रम सुरू करावा... पण तशी घाईच करायला लागेल... आज ऋतुशांतीची पूजा आहे. काल सत्य नारायणाची होती.. त्याशिवाय परवानगीच नाही मुळी नवरा नवरीला एकत्र झोपायला.... सगळं नीट पार पडले म्हणजे मी मोकळी... आता २ - २ सूनबाई आहेत म्हतल्यावर खर म्हणजे काळजी नकोच करायला... पण न करून तरी कसे चालेल ?... आजुन योगिता ला तरी सगळे आपले रितीरिवाज कुलाचार एकटीने कुठले पार पडायला... पण शिकतीये हळू हळू तशी मोठी श्रद्धाळू पोर आहे हो.. सगळं ऐकते.. आता ही धाकटी ही प्रेमळ वाटत आहे म्हणा... पण नोकरी करणार म्हणत आहे... सगळं घरातलं व्यवस्थित करून नोकरी करणार ना... मग काही हरकत नाही... उद्या पाळणा जरी हलला तरी मला काही जड नाही जाणार हो तिचं मूल सांभाळायला.

नाहीतरी योगिताचे दोघे ही माझ्याच अंगावर आहेत.. चला साडेपाच झाले उठायला हवे...

बाकी पूजा मात्र अगदी छानच झाली हो ऋतुशांतीची... मोडक गुरुजींनी पूजा केल्यावर छानच होते पूजा.. मग ती अगदी कुठलीही असो... घरात कसं शांत समाधानी वाटत नंतर.. असं वाटतं अश्याच कुठल्या न कुठल्या तरी पूजा नेहमीं कराव्यात घरी.. मुलांचा चिवचिवाट, पुरणा वरणा चे वास, सूनांची लगबग, सोवळ्या ओवळ्याचा मान.... खूप खूप समाधानी वाटते नंतर... उदबत्तीचा वास, फुल, मोडक गुरुजींचे शब्द... घर कसं भरून जातं....

आणि आपण आपले सगळे कुळाचार, कुळधर्म पाळत आलोय म्हणून तर असे भरभराटीचे दिवस आहेत. आणि त्यामुळे योगिताला ही मी आधीच बजावले की ते चार दिवस बाजूला बसलेच पाहिजे हो.. आधी ती थोडी नाराज होती.. पण नंतर काही तक्रारीला जागा नाही ठेवली पोरीने... जग कितीही पुढे जाऊ दे नाहीतर मागे येऊ दे, कम्प्युटर फॅम्प्युटर काही का येऊ दे... या सगळयांचा आपल्या कुळधर्म, कुळाचाराशी खेळ नको.. देवाच्या बाबतीत कसला आलाय अगोचर पणा??... जे नियम आपल्या पूर्वजांनी घालून दिले ते पाळावेत. म्हणजे आपली संस्कृती, संस्कार कसे टिकून राहतात. आणि आवड नसण्यासारखं आहे काय मेलं त्यात.. लोक म्हणतात... आम्ही पूजा अर्चा करतो हो... पण उपास तपास, नेम नियम कुठे जमतं हो आजकाल... मी म्हणते.... देवाने सांगितलेलं न

करण्याचं या लोकांच्या डोक्यात येत तरी कुठून ?? उद्या काही झालं म्हणजे बसतात नशिबाला दोष देत... त्यापेक्षा आधीपासूनच करावं की नाही सगळं ?... पण नाही....

आता ऋतुशांतीची पूजा व्यवस्थित झाली म्हणजे पुढे ही सगळेच व्यवस्थित च होईल.... आता दोघांनीही एकत्र झोपायला हरकत नाही... नाहीतर झालं लग्न चालले फिरायला... अजय तर सांगत होता की ही आजकालची मुलं तर म्हणे..... लग्नाशिवाय च..... ई ई.... शिव शिव !! देवा तूच रे सांभाळ...

आता काय देशपांड्या न कडे..... २ मुलं २ सूना नातवंडं, येणारी नवीन नातवंडं... माझं घर कसं छान गोकुळच जणू... हो माझं गोकुळच.....

## भाग २

या कथेतील पात्रेच कथानक पुढे नेणार आहे. आधीच्या भागात आपण गोपिकाबाई यांचे मनोगत बघितले... आज प्रिया काय म्हणते आहे ते पाहू.

प्रिया

रोहन आयुष्यात आला आणि तेव्हाच जाणवलं काहीतरी वेगळं घडतंय.... कॉलेज मध्ये असताना कधी त्याने विचारले नाही पण भावना लपून राहतात का ? हे नुसते आकर्षण नाही हे दोघांनाही

जाणवत असावे. त्याची नजर, त्याचे अंतर ठेवून पण काळजी दर्शवून वागणं सर्व काही सांगू शकत होते पण त्याने कधी विचारले नाही. मी ही मुक राहून मुक समंती दिल्यासारखे होते. त्याने नंतर सोहनी अँड इंडस्ट्रीज मध्ये जॉब घेतला आणि जणू तो याच क्षणाची वाट बघत होता. मलाही अपेक्षित होतेच आणि त्याने मला अगदी साधेपणाने प्रपोज केलं. खरतर शब्दाविना एकमेकांना कळलेच होते... खरच.. प्रेम ही भावना लपवता येणं शक्यच नसते ना... सगळं आयुष्य ढवळून टाकणाऱ्या या भावनेवर आपलं काहीच नियंत्रण नसते... मनाला जे आवडते ते तो जाहीर करून मोकळा होतो... मग ते प्रेम यशस्वी होवो किंवा नाही... त्याची पर्वा मन कसलं करतोय... पण सुदैवाने अयशस्वी प्रेमाचा ओरखडा आमच्या वाटेला नाही आला. मला वाटले होते बाबा कदाचित नकार देतील पण बाबांनी त्यांच्या आणि आमच्या घरातील जी तफावत होती ती माझ्या निदर्शनास आणून दिली आणि निर्णय माझ्यावरच सोपवला... मग मी विचार केला... सोवळे ओवळे, परंपरा, कर्मकांड यामागे काहीतरी चांगला आणि शास्त्रीय उद्देश च असतो ना... पण त्याचे स्तोम माजवणे, अवडंबर करणे, त्यातून स्वतःचा स्वार्थ साधणे हे मला कधीच मान्य नाही... आणि रोहन ही मला असा कधीच वाटला नाही. पण मी त्याच्याशी या विषयावर बोलले... आणि माझा विश्वास सार्थ ठरला. रोहन ने मला दिलासा दिला म्हणाला मला पण काही गोष्टी पटत नाही पण आपले काही वाईट होणार नसेल आणि त्यातून घरच्यांना समाधान मिळणार असेल तर काय

हरकत आहे... मला हे मान्यच होते.... स्तोम आणि भीतीपोटी कर्मकांड नाही.. पण आनंद, समाधान, प्रेम पसरविणारया परंपरा मला नक्कीच मान्य होत्या.

आणि काही खटकायला लागलं तर रोहन आहेच ना. मला त्याच्यावर एवढा विश्वास कसा वाटतो काय माहिती... प्रेमाचेच दुसरे नाव विश्वास असते का ?

आणि आमचे लग्न झाले अगदी पारंपरिक पद्धतीने सगळे काही त्यांच्या मनासारखे. काही विधी वगळता मी ही हे सगळे खूप एन्जॉय केले. अगदी दणक्यातच झाले आमचे लग्न. पाठवणीच्या वेळी बाबांनी मला जवळ घेऊन सांगितले की... सगळ्या मोठ्या माणसांना मान देणे हे तुझे कर्तव्यच आहे तू घरात सगळ्यात लहान असणार आहे वयाने. मला माहित आहे तू व्यवस्थित च वागशील कोणाला मुद्दामहून दुखवू नये, परंतु एक मात्र नेहमी लक्षात ठेव स्वतःच्या आंतर आत्म्याशी कधीच तडजोड करू नकोस तरच तू खर आयुष्य जगू शकेल. आतल्या आवाजाकडे नेहमीं लक्ष देत जा. पण म्हणजे बाबांना नक्की काय सांगायचे होते ते मला तर आजूनही काही स्पष्ट झालेले नाही.. पण हळवे क्षण होते ते... मी मान डोलावली आणि हो म्हटले.

आपल्या मनातला जोडीदार प्रत्यक्ष मिळणे म्हणजे नशीबवान च. याच सुखद क्षणांचा अलवार अनुभव मी साठवून घेत आहे. मलाच माझ्या नशिबाचा हेवा वाटतोय आता.........

हे काय..... एकीकडे पूजा चालली आहे ऋतुशांती ची आणि माझं मन कुठे या सगळ्या आठवणींमध्ये रमलय... मी मनातल्या मनात च स्वतःला टपली मारली आणि हसू लपवले.

कसा विधी आहे हा ऋतुशांतीचा दुसर नाव या विधीचे म्हणजे गर्भाधान... या नावातून च सगळं स्पष्ट होत आहे. लग्नानंतर एक दोन दिवसांनी होणारा हा विधी ... तोपर्यंत दोघांना एकत्र झोपण्याची परवानगी शास्त्रानुसार नाही.

हे भगवान.. परत माझं मन भरकटते आहे... आता माझी ही उत्सुकता शिगेला पोचत आहे. आणि एकीकडे मनात भीती ही दाटून येते आहे.... कशी असेल आजची रात्र... आजपासून मी एका नव्या जगात प्रवेश करणार... आत्तापर्यंत पूर्णतः अनोळखी असणाऱ्या !! मैत्रिणीचे चिडवणे आठवून आंगावर शहारे उठत आहे.... खर म्हणजे मलाही रोहनचा स्पर्श हवाहवासा वाटतो आहे. आत्तापर्यंतचे ओघाने किंवा मुद्दामहून झालेले चोरटे स्पर्श आठवून आत्तासुद्धा अंगावर रोमांच उठत आहेत........ आता जास्त स्वप्न बघण्याची गरज नाही... ती वेळ आता काही तासांवर येऊन ठेपली आहे, मला बहुदा त्यावेळेस काहीच सुचणार नाही, आत्तापर्यंत कथा कादंबऱ्या यातून वाचलेला प्रणय येतोय डोळ्यासमोर.... तसच असतं का सारं... की अजून काही वेगळं ?... रोहन ला आत्ता काय वाटतं असेल ? छे... काहीच अंदाज नाही येत आहे त्याच्या चेहऱ्यावरून.... मला तर आत्ताच पूजा करतानाही लाजल्यासारखे

होत आहे.... पण आजपासून आम्ही दोघेही एकरूप होणार हे नक्की.. आमची जवळीक तेची वीण आजूनच घट्ट होणार आता.... मला खूप आश्वासक वाटतो रोहनचा सहवास... मला त्याला समर्पित व्हायला नक्की आवडेल.... पण.. पण... कसं असेल आमचं पहिलं चुंबन.... त्याला मी आवडेल का ? तो पहिल्यांदा काय बोलेल माझ्याशी ? मला तो जवळ घेईल तेव्हा पहिला शब्द काय असेल त्याचा.... मला या लाजेच्या डोहात बुडताना कसा सावरेल तो मला ?.....

अरे बापरे... कुठे भरकटते आहे माझे मन.... पूजाही संपायला आली आता... गुरुजींनी रोहनला मला दुर्वांचा रस द्यायला सांगितलं... काय असेल याचा अर्थ.....

कशी असेल माझी आजची पहली रात्र..... पूजा संपली... पण आज रात्रीपर्यंत हेच सगळे विचार माझा पाठलाग करणारच आहे …

## भाग ३

प्रिया

झाली !! पहिली रात्र आली आणि गेली.. अगदी खूप काही सजवल वगैरे नव्हतं पण आमच्या पलंगावर गुलाबाच्या पाकळ्या टाकल्या होत्या. अगदी घरातल्याच कपड्यांवर होते मी... तेच जरा ठीक ठाक करण्याचा प्रयत्न मी केला. मला योगिता खोलीत घेऊन गेली. रोहन

पलंगावर बसला होता. योगिता ने पूजेचे ताम्हण, तांब्यात पाणी फुल आणून टेबलावर ठेवलेले होते, तिने मला रोहन चे पाय ताम्हणात ठेवून ते धुवायला सांगितले. गंध लावून फुल ठेवायला सांगितले. नंतर परत त्याचा पायावर पाणी घालून ते पाणी थोडंसं प्याल्यासारख कर असं म्हणाली. असं सगळं सांगताना तिचा चेहरा पूर्ण कोरा होता... पण या सगळ्या कृतींचा अर्थ ??? मी त्याला पूर्णतः समर्पित व्हावे असं तर नव्हे ???...... तशी तर आजची रात्र आणि पुढचं सगळं आयुष्य त्यालाच समर्पित होत... पण हे सगळं असं करताना मनाचा पार गोंधळ उडाला. योगिता नंतर लगेच निघून गेली. जाताना तिने दरवाजा ओढून घेतला. रोहन ने तो आतून लावला... आणि माझ्या काळजाचा ठोकाच चुकला... रोहन ओळखीचा असूनही मला काहीच सुचत नव्हते. मी गोंधळून तशीच खाली मान घालुन उभी राहिली. त्याने मला जवळ घेऊन पलंगावर बसवले, मी पुढे काय असा विचार करत थोडी भीती, थोडी उत्सुकता, आणि लाजेचा साज लेऊन त्याच्याजवळ बसले........ आणि या सगळ्या भावना पैकी फक्त माझी भीती च खरी ठरली...... माझा पूर्ण अपेक्षाभंग झाला. मला कळेना त्याला कसे आवरावे.... तो माझ्याशी एक शब्दही न बोलता शृंगार करत होता... पण त्याला शृंगार तरी कसे म्हणावे ???? मी त्याच्याशी बोलण्याचा खूप प्रयत्न केला पण तो काहीही ऐकायला तयारच नव्हता.... मला मघाशी केलेली त्याची पायांची पूजा आठवली... तरीपण मी निकराने त्याला अडवण्याचा, त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत राहिले.... खूप

वेळ... त्याला अडवून त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न करत राहिले..... नको प्लीज.... ऐक आधी थोड माझ,... मी काय म्हणते आहे ते तरी समजून घे.... अश्या विनवण्या मी त्याला सारखी करत होते.... पण त्याच्यापर्यंत यातलं काहीही पोचत नव्हत. आणि माझ्याच नवऱ्याला विरोध करून मी थकले...... पण पण सगळ व्यर्थ ठरलं.... आणि मग थकून, दुःखी होत नाईलाजाने त्याला स्वाधीन झाले. पण स्वाधीन झाले ते माझे शरीर होते... माझ्या मनाविरुद्ध..... त्याला कसली एवढी घाई होती मला कळेना... त्याच ते माझ्यावर तुटून पडणे केव्हातरी थांबले... मी अगदी निश्चल पडले होते, त्याच्या या कृतींना मी काहीच प्रतिसाद देऊ शकले नव्हते... आणि त्याला ते अपेक्षित ही नव्हते.... त्याला काहीच चुकल्यासारखे पण वाटत नव्हते. तो खूपच खुश जाणवत होता एवढं सगळं झाल्यावर त्याने माझ्याकडे हसून बघितलं... पण त्याला माझा झालेला ठोकळा, माझा दुःखी चेहरा, काही काही जाणवलं नाही ???? आणि आता माझ्या मनातली लज्जा संवेदनाहीन झाली होती.... मी यांत्रिक पणे कसेतरी कपडे चढवले आणि पलंगावर पडले.... त्याने मला परत जवळ घेतले.... तो खूप खुश वाटत होता.... पण.. पण आता मला त्याची, त्याच्या स्पर्शाची काहीच ओढ वाटत नव्हती.... त्याच्या स्पर्शाने माझ्या अंगावर रोमांच उभरलेच नाही.... मी दुखावले गेले आहे का.... की हे सगळे असेच असते.... शारीरिक सुख जे म्हणतात ते हेच असते का... पण फक्त पुरुषाला च मिळते का.... की माझ्यात च काही कमी आहे..... मला

या सगळ्याची आधीच नीट माहिती करून घ्यायला पाहिजे होती का.... आणि... आणि आता रोज रात्री..... याच सगळ्याचा सामना करायचा????? मी खूप साऱ्या प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले....

.... तो खूप अबोल, शांत आहे हे मला कॉलेज मध्ये असताना जाणवले होते.... त्याने लग्नाच्या आधी स्वतः हून मला स्पर्श करण्याचा कधीच प्रयत्नही केला नव्हता....... आणि आताचे त्याचे असे वागणे.... जणू तो फक्त या रात्रीची वाट पाहत होता..... त्याला आता समाजाने माझ्याशी शारीरिक संबंध ठेवण्याची परवानगी दिली आहे..... आणि मी आता त्याची प्रॉपर्टी आहे असेच त्याचे आजचे वागणे होते...... जणू काही मला काहीच भावना, काहीच संवेदना, नाही असे त्याने ठरवले होते की काय..... त्याला त्याच्या इच्छा त्याच्या आनंदाच्या पुढे काहीच दिसत नव्हते.. माझा विरोध जाणवत नव्हता... माझा अपेक्षाभंग होऊन माझ्या शरीराचा झालेला ठोकळा जाणवत नव्हता.......

.... त्याने आताही मला जवळ घेतले होते... पण आता.... आता माझ्यातल्या लाजेची, आकर्षणाची, त्याच्याबद्दल असणाऱ्या ओढीची जागा.... आता भीती, किळस, आणि दुःखाने घेतली होती........

## भाग ४

गोपिका

रोहन संसाराला लागला आणि माझी अजुन एक जबाबदारी कमी झाली आता नातवंडांची वाट बघायची. कालची रात्र रोहन प्रियाची पहिली रात्र... सगळं व्यवस्थित च पार पडले असावे.... आणि व्यवस्थित पार पडण्यासारखे आहे तरी काय त्यात म्हणा..... पाण्यात पडल्यावर पोहायला शिकतोच की माणूस. आता हनिमून ला जाणार दोघं जण. मी म्हटलं काय गरज आहे जायची योगिता अजय तरी कुठे गेले होते हनिमूनला ? पण मग अजयच म्हटला.. अग् आम्ही नाही गेलो पण त्यांना जाऊ दे.. आजकाल जातातच सगळे जण लग्नानंतर फिरायला.

मलाही पटलच म्हणा ते. हो.. जातातच आजकाल सगळे जण लग्नानंतर फिरायला. जाऊ दे हो.. सुखरूप जा आणि सुखरूप परत या नवी नवरी आहे म्हणून काळजी.. बाकी काही नाही... होऊन जाऊ दे त्यांची पण हौस....

. आणि जाऊन विशेष करणार तरी काय म्हणा... पण

हनिमून हनिमून लोक एवढा काय उदो उदो करतात कोण जाणे ??

पण आमच्या वेळी नव्हते हो असं काही. मला तर मेलीला काही कळतच नव्हत आणि माहिती पण नव्हत. अवघं १६/१७ वय. पण आईने बजावून सांगितलं होतं... हे बघ गोपीका, पुरुषांना रात्रीच कशाला नाही म्हणायचं नसतं. आपल्याला नाही आवडली एखादी गोष्ट तरी समजून घ्यायचं... शेवटी पुरुषच तो.. त्यांच्या कलान घ्यायचं... आपला वंश वाढवायचा तर थोड करायचं सहन...

मला तर सुरवातीला खूप भीती आणि लाज वाटायची.. मग होते सवय हळू हळू.... आणि एवढं आहे तरी काय त्यात जगावेगळं... मला तर नंतर काही विशेष नाहीच वाटलं त्यात... सगळ्या रात्री सारख्याच... घरात एवढी माणसं. भरलेलं घर... सुरवातीला एक खोली मिळाली होती आम्हाला पण नंतर हळू हळू धाकट्या दिरांची लग्ने होत गेली आणि आम्ही कधी हॉल मध्ये झोपायला लागलो कळलंच नाही.... पण तेच तेच मेलं काय नेहमी नेहमी.. या पुरुषांना सोस तरी किती म्हणायचा... पण वृत्तीच त्यांची ती आपण स्त्रियांनीच समजून घेतली पाहिजे.... थोडे वर्ष चालणार... मग एकावर एक पाळणा हालल्यावर या धबडग्यात वेळ तरी कुठला मिळायला एवढा....

रोहन ला पण सांगितले पाहिजे लवकर नातवंडं दे रे बाबा मला... हाती पायी धड असताना खेळवू दे मला त्यांना....

त्यातून प्रिया नोकरी करायची म्हणते आहे.. करू दे... आजकाल करतात मुली नोकऱ्या घराचं सगळं सांभाळून... आणि मी आणि योगिता आहोतच मदतीला....

आता श्रावण येणार... व्रतवैकल्ये, सणवार, पुरण वरण.... सगळीच लयलूट.... योगिता ला अता जमत सगळं छान.... प्रियालाही तयार केलं पाहिजे. तिची मंगळागौर, शिवामूठ.... सोवळ ओवळ... शिवाशिव... काटेकोर पणे पाळले गेले पाहिजे.... आणि हो..... सगळ्यात महत्वाचे म्हणजे नवस... मी बोलले होते संवळगाव च्या

देवीला... तुझ्याकडे येईल.. चांगला पुरणावरणाचा स्वयंपाक करेल तुझ्या दारात, २१ नारळाचे तोरण बांधेल तुझ्या दाराला सवाष्णीला साडी चोळी... सगळं अगदी सोवळ्यात करेल.. तुझ्या मंदिरात येऊन....... माझ्या दोन्ही मुलांना चांगल्या नोकऱ्या लागू दे... दोन्ही पोरांचे लग्न होऊ दे....

जरा लांबच आहे सवळगाव इथून १० तासांचा प्रवास. वैतपुर पर्यंत. तिथून पुढे ३ तास गाडीने.... पण जायला तर पाहिजेच ना... अजय ला सांगून आजच सगळं ठरवते.. रोहन, प्रिया सिमल्यावरून आले की जाऊ लगेच... नंतर परत रोहन चे ऑफिस सुरू झाल्यावर तो कंटाळा करेल... अजयसारखा तो निमूटपणे ऐकतो थोडेच... त्याला भारी प्रश्न असतात... का ?... कशाला. ?...... त्यालाही बजावून सांगते... सगळ्यांनी जायलाच पाहिजे आहे... नवस च बोलले आहे मी तसा...

प्रिया

आम्हाला लगेच सिमल्याला जायची तयारी करायची होती. हनिमूनला आम्ही सिमल्याला जाणार होतो. रोहन ने आधीच सगळे बुकिंग करून ठेवले होते. अगदी आनंदात होता तो. त्याच्याकडे बघून मला वाटले त्याच्या नकळत च असे झाले असेल त्याच्याकडून... मीही त्याला मला बसलेल्या धक्क्याचा मागमूस लागू दिला नाही. नेहमीप्रमाणे घरात वावरायचा प्रयत्न करत होते मी.... आम्ही सगळ्यांना नमस्कार करून जायला निघालो.

सासूबाईंनी काळजीने नीट जा सांगितलं. मला त्या खूप प्रेमळ वाटल्या.

आता ७/८ दिवस फक्त रोहन आणि मी.... अजय आम्हाला सोडायला आला होता. रात्रीचा प्रवास, त्यातून लग्नाची झालेली धावपळ मला लगेच झोप लागली. थोडी गाढ झोप झाल्यावर अचानकच मला जाग आली. कालची रात्र डोळ्यासमोर उभी राहिली आणि विचारचक्र सुरू झाले. भीती आणि किळस दोन्ही मनात दाटून आले.... माझच शरीर मला अनोळखी वाटू लागले. आता रोज तर रात्र येणारच मग परत परत त्याच प्रसंगाला सामोरे जावे लागणार.... किती वेळा... अगणित वेळा ???कसं होणार ? इतका विश्वासा चा रोहन मला आज इतका कसा परका वाटू लागला... कुठे गेली माझी उत्सुकता, कुतूहल, त्याच्या स्पर्शाने उठणारे रोमांच कसे नाहीसे झाले..... आता मी त्याची सहचारिणी कशी होऊ.... आयुष्याच्या अंतापर्यंत असेच चालू राहणार का... आणि जर असेच चालू राहिले तर... तर.. आमचे प्रेम टिकून राहील का... आधी आम्ही एकत्र होतो कॉलेज ला... पण नेहमी घोळक्यात.... कधी फक्त दोघे एकत्र फिरलो नव्हतो... रोहन ने अगदी त्याचा जॉब कन्फर्म होईपर्यंत वाट बघितली आणि नंतरच आमच्या घरी लग्नाचे विचारायला आला होता... लगेच लग्न ठरून झाले सुद्धा...... एवढा संयमी असलेला रोहन कसा असा वागू शकतो ??.. असं काही घडेल असं वाटलच नव्हतं कधी..... पण सगळ्यांच्या आयुष्यात असच होत का ?? मग मी बघितलेली सगळी स्वप्ने

खोटीच का.... नाही... असे नक्कीच नसेल... कुठेतरी माझेही काही चुकत असेल... त्याला माझ्या अपेक्षांचा अंदाज नसेल आला..... मी ही त्या रात्री साठी तयार होते पण अशी नाही... त्याने आधी कुठल्याच प्रकारे माझ्याशी संवाद साधला नाही,..... शारीरिक, मानसिक, प्रत्यक्ष शब्दांनी... कुठल्याच प्रकारे नाही..... फक्त एक विधी उरकावा अशी ती क्रिया उरकली.... पण असेच चालू राहणे कठीण आहे.... त्याने नाही तर मी तरी संवाद साधला पाहिजे. शेवटी जोडीदार आहे तो माझा. माझ्या आयुष्यभराचा सखा... सोबती.. तो कुठे चुकला तर मी सांभाळून घेतलेच पाहिजे त्याला.... त्याच्याशी या विषयावर बोललेच पाहिजे.... पण.. पण जर त्याने समजूनच नाही घेतले तर.... नाही.. असं नाही होणार... समजून घेईल तो मला.. खरच सिमल्याला पोचल्यावर सगळं सांगेल मी त्याला... त्याला नाहीतर कोणाला सांगणार सगळं माझ्या मनातलं..

त्याच प्रेम आहे माझ्यावर आणि माझही... मग उगीच गैरसमज वाढवण्यात काय अर्थ आहे.... त्याच्याशी बोलायचं ठरवल्यावर आता मला खूप बरं वाटत आहे.... सिमल्यात पोचलो आणि हवेतली जादू जाणवली. मन प्रसन्न झाले. हॉटेल मध्ये आल्यावर फ्रेश झालो. रोहनने मला जवळ ओढले आणि मी ही त्याच्या बाहुपाशात विसावले... तो समजून घेईल अश्या विश्वासाने त्याच्या खांद्यावर मान ठेवली आणि मग आपोआपच शब्द यायला लागले... मनमोकळे पणाने मी त्याच्यासमोर व्यक्त होऊ लागले... कितीतरी वेळ आम्ही बोलत राहिलो...

( प्रिया आणि रोहन चे काय बोलणे झाले ते आपल्याला रोहन सांगेल... थोडी वाट बघितली पाहिजे 😊)

.................. ,..........

सिमल्या हून आम्ही आलो. आनंदाने योगिता सासूबाईंनी आमचे स्वागत केले. घराशी आता माझी हळू हळू ओळख होणार होती. योगिता च्या मुलांशी समीर, सिद्धी शी तर माझी लगेच गट्टी जमली. त्यांना नवीन काकुबद्दल अगदी कुतूहल होते... ते दोघे ही माझ्या आसपासच असायचे. त्यांच्याशी बोलताना खूप मजा यायची. खूप गोड मुलं आहेत ही....

नंतर लगेचच आम्हाला दोन दिवसांनी नवस फेडायला सावळगाव ला जायचे होते. संध्याकाळची गाडी होती. अजय ने जायचे रेसेर्व्हशन करून ठेवले होते. परत येण्याचा दिवस नक्की नव्हता म्हणून तिथे गेल्यावर रेसेर्व्हशन करू असे ठरले. आणि सकाळपासूनच समीर मलूल होता. हात लावून बघितलं तर त्याला चांगलाच ताप वाटत होता. मी योगिताला म्हटले तू, समीर, अजय इथेच थांबू शकतात का ? आम्ही सिद्धीला घेऊन नवस फेडून येऊ शकतो का ? पण सासूबाई आणि योगीतला हे पसंत नाही पडले. सगळ्यांना घेऊन येईल असा नवस आहे असं त्या म्हणाल्या. आणि आता एवढं सगळं जुळून आलंय तर जाऊनच येऊ म्हणून जाण्याचा गडबडीत समीर साठी मेडिकल मधून गोळी आणण्यात आली. ती त्याला दिली. सासूबाई ंची बांधाबांध सुरू होती. सगळे पुरण वरण

चे सामान, नारळ, साडीचोळी सगळं व्यवस्थित आहे ना याची खात्री त्या परत परत करून घेत होत्या.

वैतापुर ला आमच्या मावस सासू बाई राहत होत्या. त्याही विधवा होत्या. त्यांच्याकडेच आम्ही उतरणार होतो. वैतापूर अगदी छोटेसे गाव.. आणि तिथून पुढे ३ तास सवाळगाव.. वैतपूर ला पोचेपर्यंत समीरचा ताप कमी जास्त होत होता. पण तिथे गेल्यावर तो उलट्या करायला लागला. तो झोपूनच होता. सगळं आवराल्यावर अजयने तिथे जवळपासच्या दवाखान्यात त्याला नेऊन आणले. अगदी छोटेसे गाव होते ते. तिथे डॉक्टर ही शहरातून अगदी ४ तासच फक्त सकाळी यायचे. त्यांनी काही त्यांच्याकडची औषधे दिली आणि आराम करायला सांगितला.

दुसऱ्या दिवशी आम्ही सगळे सवळगांव ल जायला निघालो. मला वाटले होते आम्ही इथून सगळा स्वयंपाक करून नैवद्य तिथे दाखवू... पण नाही... नवस बोलल्याप्रमाणे तिथेच सगळा स्वयंपाक करायचा होता. चूल मांडली गेली आणि पुरण शिजायला टाकले सासूबाईंनी. मी त्यांना त्या सांगतील तशी मदत करत होते. सगळे जणच कामाला लागले. ऊन अगदी मी मी म्हणत होते. आसपास अगदी तुरळक झाडं होती. त्यातून उन्हाळा... समीरचा ताप वाढतच होता. त्याचा जीव कासावीस होत होता. त्याला एका झाडाखाली झोपवले तो योगिता ला काही सोडेना. लहान मूल ते. आई पाहिजेच

अश्या वेळेला त्याला. तिला समीर जवळ बसवून आम्ही सगळे कामाला लागलो.

मी तर पहिल्यांदाच असं चुलीवर स्वयंपाक करताना बघत होते. एकीकडे खूप मजा वाटत होती तर एकीकडे कंटाळा आला होता. कधी होणार स्वयंपाक? कधी नैवद्य दाखवणार ? पोटात कावळे ओरडत होते. कारण आमचा सगळ्यांचा आज सकाळपासून कडकडीत उपास होता नवसाचा. फक्त सिद्धीला बिस्कीट खायची मुभा होती. सगळे उरके पर्यंत २ वाजून गेले. नैवेद्य, ओटी, जेवण सगळं काही व्यवस्थित झाले. समीरचा ताप काही उतरेना. योगिता च्या डोळ्यात पाणी यायला लागलं. आता सर्वांनाच काळजी वाटू लागली. तसच लगोलग परत आमच्या घरीच जायचे ठरले कारण अजय आणि रोहन चे म्हणणे होते आपण आपल्या फॅमिली डॉक्टर लाच दाखवलेले बरे. आणि ते बरोबरच होते. नाहीतरी नवस झालाच आहे फेडून. रोहन ने लगेच जाऊन आमची सगळ्यांची तिकिटे काढून आणली. पण रेसेर्व्हेशन काही मिळाले नाही ऐनवेळेस. सारख्या गार पाण्याच्या घड्या, अंग पुसून घेणे चालूच होते पण ताप उतरत नव्हता. नेहमीं माझ्या अवतभोवती करणारा छोटासा जीव कोमेजून गेला होता. सासूबाई ही त्याच्या जवळ बसून होत्या. त्या योगीताला म्हणत होत्या. अग आम्ही दोघी विधवा ( त्या स्वतः आणि मावस सासूबाई ). प्रिया नवी नवरी तिला आजुन सोवळे ओवळें नीटसे कुठले जमायला. त्यामुळे तुझ्या हातून सवाष्णीच्या ओटीचे सगळे झाले ते बरे झाले हो. नाहीतर रुख रुखं

लागली असती मनाला. आणि आता व्यवस्थित नवस फेडला आहे. सगळं चांगलंच होईल हो आता.... त्याही परिस्थिती त मला हसू आलं आणि मनातल्या मनात मी डोक्याला हात पण लावला.. आजूनही विधवा सधवा.. हा भेदभाव मला जरा न पटण्यासारखा होता.....

कसलं काय.......

रात्रीच्या प्रवासात समीर उल्ट्यानी बेजार झाला. त्याच्या अंगात आता उठून बसण्याचेही त्राण उरले नाही. एकतर रेसेर्व्हशन नाही. कशीतरी समीर पुरती जागा मिळाली. समीरची ही दशा कोणालाच बघवत नव्हती. सासूबाईंनी हात जोडले. परत सत्यनारायणाची पुजा अगदी यथासांग घालेल, यावेळेस गौरीला नवीन मुखवटे, यथाशक्ती गौरीसाठी सोन्याचे नवीन दागिने घालेल. आमच्या समीर ला लवकर चांगले बरे वाटू दे... असा नवस बोलला.........

## भाग ६

योगिता

त्या दिवशी समीर चा ताप पाहून माझे तोंडचे पाणी पळाले होते. घरी आल्या आल्या लगेच त्याला दवाखान्यात घेऊन गेलो. त्यांनी आवश्यक तपासण्या केल्या आणि लगेचच त्याला ॲडमिट करून घेतले. कारण खूप अशक्तपणा आला होता त्याला. टायफॉईड चे

निदान झाले. पण लगेच योग्य औषधे दिली गेली. देवाचीच कृपा वेळेत निदान झालं. आणि आम्ही नवस फेडून लगेचच निघालो ते अगदी योग्य झालं. नाहीतर त्या छोट्याश्या अनोळख्या गावात काय केलं असतं आम्ही. ?

हळू हळू समीरची तब्येत सुधारली. आणि तो परत हसू खेळू लागला. प्रियानेही मुलांना चांगलाच लळा लावला. तशी ती मनमिळावू आहे. पण चांगलीच स्पष्ट पणाने मतं मांडते तिची. मग समोर कोणी का असेना. त्याचा प्रत्यय आम्हाला लवकरच आला. प्रिया रोहन चे पाहिले वर्ष लग्नानंतर. सगळे सण वार व्रत वैकल्ये अगदी जोरदार झाले. मंगळागौर शिवामूठ सगळे उपास विविध प्रकारच्या पूजा.... सगळे सगळे साग्रसंगीत झाले. प्रियनेही ते खूप एन्जॉय केले. शिवामूठ वाहतानाची प्रार्थना तिला सांगितली आणि काय आश्चर्य तिला ती खूपच आवडली. सासूबाईंना चांगले समाधान वाटले. पण... पण ते थोडेच दिवस टिकले. बघता बघता वर्ष संपून गेले.. आणि प्रियाने नोकरी करायचे ठरवले. मिळाली ही तिला लगेच तिच्या मनासारखी नोकरी. तिचे रूटीन सुरू झाले. आणि तिची तारांबळ उडू लागली. साग्रसंगीत नाही तर निदान साधी सणावरांची पूजा, सोवळे ओवाळे, उपास तापास, मंदिरात जाणे.. तिला नीट काहीच करायला जमेना... एवढंच काय पण तिने ते चार दिवस बाजूला बसायला सुद्धा नकार दिला... सासूबाई ंची चिडचिड व्हायला लागली. असेच ७/८ महिने घरात नुसते तंग वातावरण... मग एकदा त्या प्रियाला खूप बोलल्या. आणि तिनेही ते शांतपणे

ऐकून घेतले. पण नंतर तिने लगेच शांतपणे उत्तर ही दिले..... देवा. !!!.. माझी झाली असती का अशी हिम्मत ?... रोहन ही काही मध्ये पडला नाही......

प्रिया म्हणाली - आई मलाही आवडते सगळे करायला..

पण तुम्ही बघत आहात आमची धावपळ आणि मुख्य उद्देश साध्य झाला म्हणजे पुरे.. हो ना ? सगळीच व्रत वैकल्ये, पूजा, उपास घरातल्यांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी, एकमेकांमध्ये प्रेम टिकून ठेवण्यासाठी आणि ते सदैव वृध्दींगत होण्यासाठीच असतात ना. यातील शास्त्र आपल्याला निरोगी आयुष्य लाभावे असेच असते ना. मग हे सगळं आपण समजून उमजून थोड आपल्या सोयीने मध्यममार्ग काढत केले तर नाही का चालणार ?

एवढी ओढाताण, चिडचिड, आणि देवाला घाबरून केलं तर फक्त कर्मकांड च साध्य होईल. त्यातून मिळणारा आनंद, मूळ उ्देशच बाजूला राहून जाईल. त्यापेक्षा साध्या भोळ्या भावाने पण निष्ठेने जेवढे शक्य आहे तेवढं करेनच मी.... आणि बाजूला बसायचं म्हणाल.... तर... ते मला पटतच नाही. आरामाची गरज आणि होणारा त्रास, तसेच काही शास्त्रीय कारणे आहेत या सगळ्या मागे... पण मग हे सगळं समजून बाजूला बसतो का आपण.... नाही ना... धुणी भांडी तर केलेलीं चालतात.. पण शिवशिव नाही... स्वच्छ नाही राहिलं तरी चालतं पण सोवळ मात्र पाहिजेच.... खर तर हे काही माझ्या मनाला पटत नाही. आणि रोहनला पण पटत नाही....

त्यामुळे शक्य तोवर मला हे जमणार नाही... रोहन चा पाठिंबा आणि एवढे स्पष्ट उत्तर ऐकून सासूबाई आणि मी दोघीही एकदम गपगार झालो. सासूबाईंनी बरीच चिडचिड आणि आदळआपट केली पण ती ठाम राहिली. थोडे दिवस चालू होत असे. पण नंतर हळू हळू त्यांच्या अश्या वागण्याची घराला सवय झाली.

बघता बघता ३ वर्ष होऊन गेली त्यांच्या लग्नाला. त्यांचे हे असे वागणे सोडले तर बाकी काहीच त्रास नव्हता त्यांचा. दोघे ही घरातल्या जबाबदाऱ्या प्रेमाने पार पाडत होते.

पण सासूबाईंना आणि. खर तर मलाही त्यांचे असे देवाचे नीट न करणे खटकतच होते. आणि मला तर पटतच सासूबाईंनी सांगितले ले सगळे. प्रियाच्या भाषेत कर्मकांड.... पण हे सगळे करून मनाला खर तर खूप समाधान मिळते. माझ्या संसारा तील हा एक अविभाज्य घटक बनला आहे. त्याशिवाय संसाराची कल्पनाच मी करू शकत नाही. मला मन गुंतवायला, शांत करायला या सगळ्याचा केवढा आधार आहे. आणि तस् पण मी मोठी सून आहे. असं प्रियासारख अल्लड वागून कसं चालेल मला.... हे सगळे मलाच तर पुढे न्यावे लागेल. रूढी परंपरा कितीही जुन्या असल्या तरी त्या पाळण्यातच सर्वांचे हित आहे. यम नियम, व्रत वैकल्ये करावं तेवढं थोडेच आहे. मनाला लगाम घालण्यासाठी, विचार शुद्ध ठेवण्यासाठी, मनावर संयम ठेवण्यासाठी हे सगळे आवश्यकच आहे नाही का? नाहीतर अनर्थ होईल. मला तर असेच वाटते. स्वतःला त्यात झोकून दिल्याने

मनाला समाधन मिळतेच आणि एवढे सगळे काटेकोर, कसोशीने पाळते म्हणून घरात, समाजात माझा मान पण टिकून राहतो ते वेगळंच....

आणि हो.... आजुन पण एक गोष्ट खटकते सासूबाईंना प्रिया, रोहन ची... ती म्हणजे सारखे एकमेकांशी लगट, चार चौघात एकमेकांशी हसून खिदळून बोलणे, काय त्या खाणाखुणा, चेष्टा विनोद, गाणी काय म्हणणे.... झाले की आता तीन वर्षे त्यांच्या लग्नाला....

.......................................................

लग्न करून या घरात येताना सगळ्या मुलींप्रमांने माझेही विश्व स्वप्नांनी व्यापले होते. स्वप्न होते एक आदर्श पत्नी आणि प्रेयसी बनण्याच, आदर्श सून बनण्याच... स्वप्न होत.. स्वप्नवत संसार करण्याचं... अजय ला जेव्हा पहल्यांदा पाहिले तेव्हाच जाणवले की होकार येणार.. नजरेने च एकमेकांना आवडल्याची कबुली दिली होती.... आणि अपेक्षेप्रमाणे होकार आला. या घरात मी भरल्या तांदळाचे माप ओलांडून आले. अर्धोंमिलित पापण्यात स्वप्नांची दाटी झाली होती. पण काही पापण्यांवरच राहिली … डोळ्यात उतरलीच नाही.... आदर्श सून होण्याचे स्वप्न मात्र साकार झाले... काय झालं. ?.. मला तर अजूनही कळले नाही.. पण अजय आणि माझं प्रेम बहरल नाही... पण.. पण प्रेम बहरण म्हणजे तरी काय असते ?? त्याशिवाय का दोन मुले झाली मला.. पण खूपदा असं वाटतं की अजयने खूपदा मला स्पर्श केला पण माझ्या मनाची तार

तो छेडू शकला नाही कदाचित.... पण हा विचारही माझ्या मनात आत्ता कसा आला??... नाही... होताच तो कुठेतरी दडलेला... पण आत्ता अचानक डोकावतो आहे... का ? खूपदा यायचं मनात अजय ला अरे तुरे हाक मारावी, त्यांच्याबरोबर एकटीने कुठेतरी फिरायला जावे. काही दिवस काही तास फक्त आपले असावे.... कधी कधी अशी संधी आलीही पण... पण कोणास ठाऊक मधल अंतर कधी भरूनच आलं नाही.. त्यांचं माझ्यावर प्रेम आहे.. माझही आहे... मग एवढी खोल पोकळी कुठली... आणि इतके वर्ष कशी जाणवली नाही... पण आता रोहन चे लग्न झाले आणि या घावाची जाणीव झाली... त्यांची जवळीक बघून मला आठवलं... लग्नानंतर फार तर काही महिने, किंवा वर्षभर असेल आमची अशी जवळीक...

जखमेवरची खपली काढून टाकावी तसं झालंय आजकाल. त्यांची जवळीक बघून सूक्ष्म असूया, हेवा वाटतो प्रियाचा... मनात दडलेल्या भावना... हो दडवून ठेवलेल्या... कितीतरी वेळा उफाळून यायच्या पण मी गप्प करायचे त्या... चूक की बरोबर.. काय माहिती ? लग्नानंतर हनिमून ला ही गेलो नाही कुठे... सगळ्यांबरोबर देवाला जाऊन आलो तेवढेच... नंतर आम्हीं एकत्र गेलो दोघे ते नातेवाईकांकडे किंवा कोणाच्या लग्नाला नाहीतर भाजी आणायला... बाहेर पडताना जे अंतर दोघांमध्ये असायचं ते कायमच राहिलं... सगळ्यांना आमचा संसार अगदी आदर्श संसार वाटतो.. आणि तो तसा आहेही... दोन सुंदर गुणी मुलं.. मोठेपणाची जबाबदारी, ती समर्थपणे पेलणारे आम्ही दोघेही आज पर्यंत मलाही

हे नात आदर्शच वाटत होत..... पण आत्ता कुठली रुखरुख डोकं वर काढत आहे काय माहीत... लग्नाच्या वाढदिवशी पण रोहन प्रिया दरवर्षी कुठेतरी फिरायला जातात... गोवा, कोकण, माथेरान... आम्ही कधीच नाही गेलो असे एकटे.... एकदा संध्याकाळी काहीतरी आणायला मी प्रियाच्या खोलीत गेले तर बाईसाहेब रोहनच्या मिठीत.... वेळ काळ काही आहे की नाही.... आम्हालाही होती रूम.. पण आम्ही काही ताळतंत्र नव्हत सोडलं... पण मग खरच... मलाही वाटायचे कधी कधी... काही कारणाशिवाय अजयने मला जवळ घ्यावे... पण त्याच्या रोमँटिक पणाच्या व माझ्या रोमँटिक पणाच्या कल्पना कधी जुळल्या नाही. पहिल्या रात्री ही घाई, नंतरही सगळे फक्त उरकणे... शरीर कधी फुलले नाहीच..... तोच सूरवात करणार.. तोच संपवणार... मी कधी त्याला नकार देत नाही. पण मन नसतेच त्यात... लग्नाआधीच स्वप्न आणि वास्तव यात खूप तफावत असते खर तर... पण कितीतरी जोडपी मी अशी प्रिया रोहन सारखी बघीतली आहेत. त्यांच्या सहजीवनात गोडी टिकून आहे... किंवा असे नसेल ही.... कोणाच्या घरातल्या, मनातल्या गोष्टी कश्या कळणार आपल्याला....

जे चाललंय तेच बरं म्हणायचं...

उगीच मन कशाला भरकटवयाचे.....

## भाग ७

रोहन

आणि ती गोड बातमी आलीच. आमच्या आयुष्यात एक छानशी गोडुली परी आली. परी आली ती सोनपावलांनी च माझ्या प्रमोशन ची न्यूज आणि प्रियाची डिलिवरी दोन्ही एकाच दिवशी... आनंद गगनात मावेना म्हणजे काय असते तो प्रत्यय झाला त्या दिवशी मला. परी च्या बाललीला, ऑफिस मधील वाढत्या जबाबदाऱ्या यात अजुन ३ वर्षे कशी निघून गेली कळलं नाही. प्रियाचाही जॉब कन्फर्म झाला होता. आमच्यामधील प्रेम आता दिवसेंदिवस वाढतच होत आणि आमच्या विश्वात आम्ही सगळेच खुश होतो. एकदा आई म्हणाली, आता जरा मुलगा होऊ दे समीर सारखा, तो पण वंशाला दिवा नको का ? पण आम्ही दोघांनीही त्याकडे सध्या दुर्लक्ष करायचे ठरवले. मुलगा म्हणजेच वंशाचा दिवा... मुलगी परक्याच धन... अश्या गोष्टी आता मागे पडल्यात पण आईला हे कसं समजवणार...

परी झाली आहे आता ३ वर्षांची. कुठेतरी फिरून यावं या वर्षी. आम्ही दोघे परी होण्याचा आधी प्रत्येक वर्षी कुठेतरी जायचो तेवढाच विरंगुळा आणि प्रिया आणि मी फक्त... मग नात्यातला गोडवा आजुन वाढतो... पण यावेळी सगळे एकत्र जाऊ शेगांव ला मागे एकदा आई बोलली होती. नेहमी तुम्ही दोघेच जाता फिरायला.

कधी कुठल्या देवाला पण जात नाही. तिची ही तक्रार पण दूर होईल. आणि एक फॅमिली ट्रीप पण होऊन जाईल.

अजय कधीच योगिता ला घेऊन कुठे गेला नाही फिरायला. योगिता सतत आपली घरात. बाहेरगावी जाणार ते फक्त कोणाच्यातरी लग्नाला, नाहीतर माहेरी... आईच एकवेळ ठीक आहे.. बाहेर जाण ही पैशांची उधळपट्टी वाटत असेल तिला, ती जुन्या काळातली, कष्टात दिवस गेले, साहजिक आहे... पण अजय, योगितला पण काहीच वाटत नाही का. इतके अरसिक आहेत का दोघे जण?.... आता सगळेजण मिळून शेगांव ला का होईना जाऊन येऊ. सगळ्यांना छान वाटेल.

मधून मधून प्रियाचे बिनसते... तिला या उपास तापास, कर्मकांडात फारसा रस नसतो. मनोभाव, आणि या जगन्नियंताला ला शरण जाणे, आहे त्या गोष्टीत समाधान मानणे... हीच तिची पूजा हेच तिचे व्रत.... त्यामुळे आईच्या आदर्श सुनेच्या संकल्पनेत ती बसत नाही. पण मला पण प्रियाचे म्हणणे पटते. मुळात मलाच स्तोम माजवले ले आवडत नाही. मग मी प्रियाला तरी कसे तेच करायला सांगू. मग जेव्हा मधून मधून प्रिया जेव्हा कुरबुर करते तेव्हा मी तिला सांगतो.. हे बघ.. ज्यामुळे काही नुकसान होणार नाही आणि घरच्यांना समाधान मिळणार असेल तर सहज शक्य आहे तेवढं करावं. त्यांना त्यांच्या चुका दाखवत बसलो तर वादविवाद अटळ आहे... आणि प्रियाही ऐकते माझे. समजूतदार आहे. आणि हुशार पण....

केवढ्या कौशल्याने तिने आपल्या मनातले मला सांगितले.

पहिल्या रात्री माझ्याकडून जरा धांदरट पणाच झाला. किंवा थोडक्यात मी तिच्यावर जबरदस्ती च केली.. असच म्हणावं लागेल. भावनेच्या भरात मी ती काय सांगायचा प्रयत्न करते आहे याकडे लक्ष च दिले नाही. ती नको, ऐकून घे म्हणत होती पण मी स्वतःला थांबवू शकलो नाही. इतके वर्ष तिची वाट पाहिली होती.... पण त्या रात्री मी फक्त माझा विचार केला... शेवटी माझ्या लक्षात आले की काहीच गवसलेले नाही. नाही मला मनासारखा आनंद आणि नाही तिला समाधान.... नक्की कुठे चुकले ते मला पण समजत नव्हते. कदाचित मी परत परत तीच चूक केली असती. पण सिमल्यात गेल्यावर प्रियाने माझ्यावर विश्वास ठेवून मला तिच्या मनातल सांगितलं आणि तेही अगदी हळुवारपणे.. माझ्या मनाला ठेच न लागू देता. ती स्वतः दुखावली गेली होती माझ्यामुळे, पण तिने त्याहिवेळेस माझा विचार केला. ती म्हणाली

रोहन, स्त्री आणि पुरुषांच्या प्रेम व्यक्त करण्याच्या पद्धती वेगळ्या असतात. दोघं ही प्रेमाचीच अपेक्षा करतात आणि एकमेकांना प्रेमच द्यायचा प्रयत्न करतात. तू पण तुझ्या पद्धतीने माझ्यावरच प्रेम व्यक्त करत असशील.. पण मला काय अपेक्षित आहे ते तू नाही का समजून घेणार ? मी ही तुझ्या अपेक्षा समजून घेण्याचा नक्की प्रयत्न करेल. पण संवाद च नाही झाला तर... तर कठीण होऊन बसेल..

रोहन... स्त्री चे शरीर बोलण्यासाठी, फुलण्यासाठी आधी तिचे मन बोलणं, फुलणं आवश्यक असतं..... आणि त्यासाठी थोडासा वेळ, थोडे प्रयत्न नक्कीच मदत करू शकतात असे मला वाटते... रोहन.. माझेही काही चुकत असेल... पण आपण दोघांनीही प्रयत्न करायला काय हरकत आहे ?.... परवाच्या रात्रीनंतर मला जरा रेसिस्टन्स आला आहे. पण मी हे तुझ्याजवळ व्यक्त करते आहे याबद्दल काही गैरसमज तर नाही ना करून घेणार तू.. प्लीज प्लीज ... समजून घेशील ना.. हो मला विश्वास आहे तुझ्यावर.. नक्कीच... तू समजुन घेशील.... आपण दोघेही ती रात्र परत जगायचा प्रयत्न करू या... चालेल का.... कसं अजुन तुला समजावू... नाही कळत मला....

एवढं बोलून ती थांबली... पण मला तिला काय सांगायचे होते ते कळले. मी ही विचार करत होतो की त्या रात्री प्रिया मला एवढी परकी का वाटत होती. त्यावेळेस भावनेच्या भरात माझ्या हे लक्षात आले नाही... पण नंतर ची तिची शांतता मनाला टोचत होती. तिने मला सांगितले तिच्या मनातले हे खूप बरे केले.... त्यानंतर आम्ही दोघांनीही एकमेकांना समजून घेण्याचा प्रयत्न केला. अजूनही या मार्गात खूप वळणे वळणे आहे... अजूनही वाट चुकतो आम्ही.. पण परत येतो हमरस्त्यावर... त्यामुळे आमचा एकमेकांवर असलेला विश्वास दिवसेंदिवस दृढ होत आहे.... पण तिने मनमोकळे केले तेव्हा मी या प्रश्नाचा बाऊ केला असता तर... किंवा दुर्लक्ष केले असते तर.... तर कदाचित आज हे चित्र नसते...

.....................................................................................

त्यादिवशी शेगांव चे बुकिंग करायला गेलो आणि ती वादळी बातमी समजली. तिथे मला अजयचा मित्र विकास भेटला. विकास जरी अजय चा मित्र तरी तो अगदी घरच्यासारखा होता. अगदी केव्हाही हक्काने घरी येणाऱ्यांना पैकी तो एक होता. त्याने मला कॉफी प्यायला नेले. मला सारखे वाटत होते त्याला काहीतरी सांगायचे आहे. शेवटी आमची जायची वेळ आली तरी हा गप्प च... मग मीच त्याला म्हटले.. काही सांगायचे आहे का तुला विकास.. काही मदत वगैरे लागत असेल तर निसंकोच पणे सांग.... त्यावर त्याने अजून एक एक कॉफी मागवली... बहुतेक आम्हाला बोलायला मिळावे अजुन म्हणून.. मग त्याने शब्द जुळवत जे सांगितले ते केवळ धक्कादायक नाही तर अनाकलनीय पण होते..... तो म्हणाला... मी तुला कसं सांगू कळत नाही.. पण सांगणं माझं कर्तव्य आहे. प्लिज गैरसमज करून घेऊ नकोस... कदाचित या मुळे माझे आणि अजय चे नातेही तुटेल... पण मला हे तुझ्या कानावर घालणं आवश्यक वाटत आहे.... रोहन,... अजय चे त्याच्या ऑफिस मधील एका स्त्री बरोबर संबंध आहेत. त्याचे काही वर्षांपासून हे संबंध आहेत... नक्की किती दिवसांपासून हे नाही माहिती... पण मी स्वतः याविषयी अजय शी बोलण्याचा प्रयत्न केला. पण त्याने मला स्पष्ट सांगितले की तू यात पडू नकोस. त्यामुळे माझा नाईलाज झाला.... प्लीज गैरसमज करून घेऊ नकोस. पण आज मला आणि काही लोकांना माहीत आहे.. उद्या तुमच्या कानावर आल्याशिवाय राहणार नाही...

म्हणून तुला सांगितले..... माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नव्हता. अजय अगदी सरळमार्गी, टिपिकल मध्यमवर्गीय होता. तो आईच्या आज्ञे बाहेर ही कधी गेला नाही... उलट मीच बंडखोर आहे मीच घरी आईला कधीकधी त्रास होईल असं वागाय चो... पण.... अजय.... कसं शक्य आहे ???? कोणीच असा विचारही करू शकत नाही....

पण विकास ही चांगला माणूस आहे. आमची बऱ्याच वर्षांची ओळख आहे. त्याने हे निव्वळ कुटाळक्या करण्याच्या उद्देशाने नक्कीच नसणार सांगितले. आणि तो जसा बोलत होता त्याप्रमाणे त्याने शहनिशा नक्कीच केली असणार.. मी कितीतरी वेळ सुन्न बसून राहिलो.... काहीतरी करणं भाग आहे... पण नक्की काय.... तश्याच दिशाहीन पण घरच्याच दिशेने मी निघालो... आणि घरी गेल्यावर नेमका अजयच समोर आला.........

## भाग ८

प्रिया

त्यादिवशी मी ऑफिस मधून आले आणि घरातली विचित्र शांतता बघून गोंधळून गेले. मुलांचे नेहमीचे मस्ती करणे चालूच होते. पण सगळे मोठे आपापल्या कोशात गेलेले आहे असं वाटलं मला. मी ही माझे नेहमीप्रमाणे आवरायला घेतलं. योगिता ला नजरेने विचारायचा प्रयत्न केला पण तिने मान फिरवली आणि तिचा चेहरा

डोळे एकदम म्लान झाले होते. मग मी रोहन कडे बघितले. पण तो ही काही न बोलता पायात चप्पल घालून बाहेर निघून गेला.

रात्री रोहनने मला सर्व सांगितलं. मलाच हा धक्का पचवणं शक्य नव्हतं... तर योगिता आणि सासूबाईं चे काय झाले असेल. खर तर रोहन आला तेव्हा योगिता आणि सासूबाई कुठल्याश्या भजनाच्या कार्यक्रमाला गेल्या होत्या. आणि मुले खेळायला. अजय समोर आला रोहनच्या तेव्हा रोहन ने एक अंदाज घ्यावा म्हणून सहज म्हटल्यासारख म्हटलं... की आज विकास भेटला होता. त्यानंतर अजय चापापणे जाणवले रोहनला... म्हणून त्याने अजून विषय पुढे नेत विचारले ह्या रोहिणी बाई कोण आहेत.. त्याच ना त्या दिवशी आपल्याकडे सत्यनारायणाच्या प्रसादला आल्या होत्या... तुझ्याच ऑफिस मध्ये आहेत ना कामाला.... ? आणि अजयचा पारा चढला. रोहन ने त्याच्यावर काही आरोप करण्याच्या आधीच त्याने स्पष्ट रोहनला सुनावले... ठीक आहे.. बर झालं तुला समजलं... आज ना उद्या कळणारच आहे... योगिता ला पण.... रोहिणी आणि मी आमचे संबंध आहेत...... पण तुम्ही कोणी मला शिकवायचा प्रयत्न करू नका. जे झालं ते झालं आणि जे व्हायचे ते होईल... माझा आणि योगिता चा हा खाजगी प्रश्न आहे. बाकी कोणी मध्ये पडायचे कारण नाही.... तो हे बोलत असतानाच भजनाचा कार्यक्रम कॅन्सल झाल्यामुळे परत आलेल्या योगिता आणि सासूबाईंच्या कानावर हे त्याचे बोलणे पडले... आणि... मग... मग जो गहजब झाला..... रोहन ने योगिता ला अजय बरोबर रूम मध्ये जाऊन बोलायला

सांगितले. आणि ते रूम मध्ये निघून गेले.... सासूबाईंनी रोहन ला विचारले त्याला कसे कळले वगैरे... आणि आता अजयच्या तोंडून त्याने स्वतःच दिलेली कबुली.... रोहन ला पण काही सुचेना... खर म्हणजे कोणीच घरात नव्हतं म्हणून रोहन ने अजय ला विचारायचा प्रयत्न केला... पण अचानक दोंघीचे परतणे आणि अजय चे स्पष्टपणे कबूल करणे.... यामुळे सगळ्यांनाच धक्का बसला.

सासूबाईंच्या रागाचा पारा चढला आणि त्या बोलू लागल्या... अरे... आपल्या एवढ्या नावाजलेल्या घराण्याचा तरी विचार करायचा होता. तीच बाई.... आठवली मला... त्यादिवशी पूजेला आली होती नटून थटून..... आणि मुख्य म्हणजे खालच्या जातीची..... आज आपण घराबाहेर जाणारा आवाज जर थांबवला नाही तर... सगळीकडे बदनामी होईल.. देवा... देवा.. असेही काही पहावे लागेल असे वाटले नव्हते रे.. तूच आहेस सर्वसाक्षी... काय चुकले रे आमचे म्हणून असे झाले... लोक शेण घालतील तोंडात... पूर्वीच्या काळी चालायची एकेक, दोनदोन अंगवस्त्र... पण आता असे नाही चालणार... माझ्या शब्दाला केवढा मान आहे समाजात.. मला तोंड दाखवायला काय जागा राहणार आता... काही लाज वाटली नाही असे वागायला, कुठे कुठे आणि कोणकोणआला पुरी पडणार मी... लोक काय नाही नाही ते बोलतील... आयते जळते कोलीत मिळाले त्यांना... आग पसरणार च... स्वतःचा नाही तर घराण्याच्या मान मर्यादे चा तरी काही विचार करावा की नाही.... मी तरी काय करू.. योगिताचे नशीबच फुटके म्हणायचे नी काय... ही

खालच्या जातीची अवदसा तिच्या मागे कशी लागली... तिनेच काहीतरी जादूटोणा केला असणार... माझा मुलगा अगदी सरळमार्गी, नाकासमोर चालणारा आहे. तिनेच काहीतरी केलं.. त्याशिवाय नाही भुलणार तो असा... एवढी वर्षे समाजात ताठ मानेने राहिलो आणि आता म्हातारपणी एवढी छी थू... सहन होणार का... नाही नाही.. मी असे नाही होऊ देणार...

मी सांगितल्यावर ऐकेल तो. योगिता चे पण काही चुकले असेल. या आजकाल च्या मुलांचे काही सांगता येत नाही. पुरुषा सारखा पुरुष च तो.... घसरल असेल पाऊल.. सावरून घ्यावेच लागेल. चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या की येईल ताळ्यावर... त्याला स्पष्टच सूनवते मी... नाही चालणार असं.... आपल्या घराण्याकडे कोणी बोट दाखवलेले चालणार नाही मला....

आईची ही बडबड ऐकून रोहन ला धक्काच बसला... तो म्हणाला... अग आई..... योगिता, मुलांचा विचार कर जरा.. ते सोडून तू हे भलतंच काहीतरी बोलते आहे...

त्यावर त्यांनी उत्तर दिले.... अरे.... घरात झाकली मूठ असते... पण बाहेर... एकदा चव्हाट्यावर वाद आला म्हणजे.... काय राहील आपली मान मर्यादा......

रोहन काहीच न बोलता सुन्न बसून राहिला.

त्या रात्री रोहन माझ्याजवळ आला आणि त्याच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. त्याला कसे समजवावे हे मलाच समजत नव्हते. काही वेळाने तो शांत झाला. पण त्याचे मन हलके व्हावे म्हणून मी त्याला बोलते करत म्हटलं... रोहन, कदाचित आता अजयला त्याची चूक समजली असेल. अजून आपण बोलू त्याच्याशी.. होईल सगळं हळू हळू व्यवस्थित....

पण तो म्हटला... नाही प्रिया.... मी अजय ला एवढं ठाम पणे बोलताना आजवर कधीच पहिले नाही... आणि त्याच्या बोलण्यावरून त्याने या प्रसंगाला तोंड द्यायची तयारी करूनच ठेवली होती असेच वाटते आहे....

आणि दुर्दैवाने मला पण असेच वाटत होते...

पण खरच.. प्रिया... का असा वागत असेल अजय... एवढी सुंदर बायको, गुणी मुले... कसं अस वागू शकतो तो.. त्याला यापैकी कुठलाच प्रेमाचा पाश रोखू शकला नाही... नक्की काय झालं... असा तो वाहवत चाललाय.... आणि त्याच समर्थन करतोय तो चक्क.

रोहन, मी जरा स्पष्ट च बोलते.. राग नको मानू... अन योगिता आणि अजय मध्ये ती विशिष्ठ ओढ, जवळीक मला कधी फारशी जाणवली नाही... जाणवली ती कर्तव्य बुद्धी, एक वेगळाच अलिप्तपणा... कदाचित हेच तर कारण नसेल ना या पराकोटीच्या उद्रेकामागे....

हो प्रिया.. असूही शकेल असे... पण का नाही उरला दोंघामध्ये प्रेमाचा ओलावा.... का भरडले जातो आपण इतके या व्यवहारिक जगात की प्रेमाचं रोप सुकून जात तरी आपण त्याला खत पाणी नाही घालत.. आपले लग्न झाल्यापासन मलाही कधी कधी जाणवायची त्यांच्या नात्यातली पोकळी... आपल्यासारखे कधी ते फिरायला गेले नाही... की आपल्या समोर कधी एकमेकांशी मनमोकळे पणाने बोलले ही नाही... पण असेल जनरेशन गॅप... असं वाटलं.. आणि त्यांचे वैवाहिक आयुष्य चांगले नाही असे तरी कसे म्हणता येईल... एवढी दोन मुले असताना...

रोहन... अरे... मुलं असणं हे च सुखी वैवाहिक जीवनाचे प्रतीक आहे का... नुसत्या शारीरिक पातळीवर असलेल्या संबंधांवर संसार चालतो का... तूच सांग... खरच फक्त शारीरिक संबंध फक्त महत्वाचे ?? मनाचे गुंतणे काय असते मग.... आपल्या नात्यात जर असा अलिप्तपणा आला तर तू काय करशील ? किंवा मी काय करेल ?

हो.. खर आहे तू म्हणते ते प्रिया.. कित्येक जोडप्यांमध्ये प्रेमाची जादू ओसरली जाते.. ती टिकवून ठेवण्याची इच्छा आणि त्यासाठी प्रयत्न दोन्ही गरजेचे आहे. आपल्या बाबतीत पण हेच झाले असते... जर आपला संवाद सुरळीत नसता तर.... कितीतरी वेळा आपल्यात गैरसमज, बेबनाव झाले पण प्रत्येक वेळेस नात्याच्या ओढीने आपण बोलत राहिलो, व्यक्त होत राहिलो. आणि यापुढे पण असेच राहू... पण खरच... असे कितीतरी अजय आणि योगिता कुढत असतील...

कदाचित असं प्रेम अस्तित्वात नसत असं स्वीकारलं पण असेल कितिजणानी...

आणि मग या व्यवहारिक जगातल्या हिशेबात तोलत असतील ते स्वतःच्या बेगडी नात्यांना... भलावणी करत असतील आपल्या नसलेल्या सुखी वैवाहिक जीवनाचे... किंवा कितीतरी अजय, योगिता लपून छपून असले मार्ग अवलंबत असतील... आपल्या अपुऱ्या शारीरिक मानसिक गरजा पूर्ण करण्यासाठी... कितीतरी जण साधी संधी ही घेत नसतील संवाद साधण्याची... किंवा अशी संधी आपल्या जोडीदाराला देत नसतील... सगळेजण अजय एवढी हिम्मत नाही करणार कदाचित.. पण तरी ते नातं आतून मोडलेले, कोसळलेले असणार.... समाजाच्या, नात्यांच्या, नातेवाईकांच्या भीतीमुळे टिकवून ठेवलेल्या या नात्यानें समाजाचा तरी काय विकास होणार.....

असच रोहन कितीतरी वेळ बोलत राहिला.....

योगिता

त्या रात्रीपासून मन सैरभैर झाले. हे सगळं काय होतंय कशाचाही अर्थ लागेना. त्या रात्री मी न बोलता बसून राहिले. काही विचारायचे, रागवायचे भानही राहिले नाही. अजय ही बराच वेळ बाल्कनीत होते. ते आत आल्यावर मला वाटले.. ते आता म्हणतील -- योगिता, असं काही नाही आहे. रोहन खोटं बोलत आहे. मी पण खोटंच बोलत होतो....... पण असं काही झालं नाही. ते म्हणाले

योगिता मला कळतंय माझं चुकतंय. पण मला तू आणि मुलं दोन्ही पाहिजे आहे. समजून घे प्लिज.

रागाने कसबस मी बोलले.... काय समजून घेऊ ? मी आणि मुलं पाहिजे... मग रोहिणी... ती नकोय ?? असे कसे वागू शकतात तुम्ही ? तिने अशी काय जादू केली आहे तुमच्यावर. की तुम्हाला आमचा विसर पडावा... मी काय कमी केलं आपल्या संसारासाठी... आणि परत माझ्यासमोर छातीठोकपणे कबूल करतानाही तुम्ही माझा थोडा पण विचार नाही केला....

असं नाही योगिता, तिने किंवा मी मुद्दामहून असे नाही केले. तुला, तुम्हाला सगळ्यांना दुखवायचं नव्हत आम्हाला.... पण.. पण नाही थांबवू शकलो. चुकले आमचे... पण आता तूच समजून घेऊ शकते. मोठ्या मनाने... आणि हे सगळं मी तुला केव्हा केव्हा तरी सांगणारच होतो.......

आणि मग ते थोडा वेळ आजुन बोलत होते... पण मी बिलकुल समजून घेण्याचा मनस्थितीत नव्हते. फक्त अश्रूंना वाट करून देणे च माझ्या हातात होते.. त्या दिवसानंतर माझे कुठेच लक्ष लागेना. सगळं पूर्वीसारखं चालू होते माझ्या कडून.... पण पूर्णतः यांत्रिक पणे... आजूनही ते बऱ्याच वेळा उशिरा घरी यायचे... पण मी गप्प बसले.... नाही बोलले काही... खूप खूप बोलावेसे वाटत होते... पण काय बोलणार ???... मला दूर लोटू नका ??? माझ्यावर परत प्रेम करा ???? असहाय पणे मुलांना पुढे करणार ??? आणि तुटलेल्या

नात्यासाठी भांडणार ???? की स्वंतत्र बाण्याने आपली एकटीची वाट शोधणार ???........ नाही... आता या वेळी मी यातले काही एक करू शकत नाही..... नाही नात्यांची उसवलेली वीण घट्ट करू शकते.... नाही मुलांना सोडुन किंवा घेऊन स्वतःची वाट शोधू शकते.... एवढी हिम्मत नाही माझ्यात. सगळंच आता देवाच्या हाती. काळाच्या हाती. जे होईल ते बघत राहायचं... आणि कुढत राहायचं.... आता तर देवावरही विश्वास नाही ठेवावसा वाटत....

खरच त्या दिवसापसून मी विचार करत आहे. मी काय कमावले काय गमावले ??? मी स्वतःला खूप सुखी समजत होते. घरातली मोठी सून, आदर्श सून, जबाबदाऱ्या, रूढी, परंपरा अगदी सगळं जिथल्या तिथे व्यवस्थित.... वेळच्या वेळी सांभाळणारी... पण मग एखादी महत्वाची बाब दुर्लक्षित राहिली का. ????म्हणजे अजय... माझं शारीरिक संबधांमधल अनाकर्षण तर याला कारणीभूत नाही ना.... पण मी तरी काय करू मनाला अशी खूपशी ओढच वाटत नाही. पहिल्या काही महिन्यातच या गोष्टीचे आकर्षण कमी झाले. आणि नंतर नंतर तर नाहीच. पण याला मी एकटी कशी जबाबदार असेल ?? त्यांनीही कधीच प्रयत्न केले नाही. हळू हळू हा विषय दुर्लक्षित राहिला. घराच्या जबाबदाऱ्या, परंपरा, सांभाळण्यात मी अगदी रंगून गेले. आणि मग बाकीच्या गोष्टी दुय्यम वाटू लागल्या. एक नशाच चढली या सगळ्या गोष्टींची....

आणि आता... कशातच मन नाही लागत... माझं आणि सासूबाईंनचे पण... आत्ता आत्ता पर्यंत किती काटेकोरपणे लक्ष घालायचे त्या.. न बोलताही सगळीकडे बारीक नजर असायची त्यांची. कितीतरी सूचना असायच्या. सासरे वारले तरी यात फारसा काही फरक पडला नाही. पण आजकाल सगळ्यातून मन काढून घेतले आहे त्यांनी. खूप शांत असतात. माझे दुःख नाही बघवत त्यांना... आणि मुलाची चूक पण नाही पोटाशी घालू शकत त्या... एवढ्या शांत कधीच नव्हत्या त्या... आजकाल प्रियाच आम्हाला आठवण करून देत असते.. आज एकादशी, आज चतुर्थी,... हे आणि ते... मग आम्ही ते अगदी नाईलाजाने उरकल्यासारखे करतो...

वट पौर्णिमा उद्यावर आली.. एरवी आत्तापर्यंत किती तयारी झाली असती. सवाष्णी च्या ओट्या, फळं, आंबे, उपवासाची तयारी, पूजेची तयारी, वडाला जाण्यासाठी खास शालू....... पूजेचे तबक तर माझेच अगदी सरस असायचे सगळ्यात.... पण.. पण... चुकले काय माझे....

माझ्या नशिबी असे का... आता तर यावर्षी काहीच करावेसे वाटत नाही.......

..........................................................................................

विश्वासघात, प्रेमभंग, याचे दुःख एकीकडे, एकीकडे अजयचे अपराधी अबोलपण, आणि मुलं की.. ज्यांना धड कळत नव्हतं

नक्की काय चाललय.... यात मी पुरती भरडली जात होते. एकीकडे प्रिया मला समजवायचा, धीर द्यायचा प्रयत्न करत होती. आणि रोहन अजयशी सारखा माझ्या अपरोक्ष काहीतरी बोलत होता. पण मी पूर्ण तुटले होते.

सासूबाई आता अचानक थकल्यासारख या वाटायला लागल्या. आणि त्यातच त्या मागे लागल्या... की मी गावाला जाऊन राहते. माझे इथे मन नाही लागत... सगळ्यांनी समजावून पण त्या ऐकेना. या वयात दोन मुलं असताना त्यांना एकट रहावेसे वाटते... हे बघून अजय, रोहन ला खूप वाईट वाटत होते. अजय पण मोडल्यासारखे झाले होते. फक्त गप्प बसले होते. मी तर बोलतच नव्हते अजयशी आणि कोणाशीच.... इच्छाच नव्हती....

प्रिया

## भाग १०

योगिता आणि अजय दोघेही दुःखी होते. सगळं घरच या प्रसंगामुळे झाकोळले गेले होते. काहीतरी तोडगा काढला पाहिजेच होता यावर..... डोके सुन्न झाले होते. रोहन सतत अजयाशी बोलत होता. पण विषयच इतका नाजूक... हाताळणे अवघड... सगळी आपलीच माणसे.. दुखवून पण नाही चालणार.... आणि आम्हाला जाणवले... अजय खरच गुंतला होता रोहिणी मध्ये... नुसत शारीरिक आकर्षण नव्हत ते. त्यामुळे अजूनच अवघड होऊन बसले होते हे सगळं.....

अजय ने रोहन ला सगळे मनमोकळे पणाने सांगितले त्यामुळे आशेचा किरण वाटू लागला. अजय म्हणाला.... रोहिणी खूप चांगली, समंजस आहे. खर तर... तिला आणि मलाही माहित आहे की हे चुकीचे आहे. पण..

पण... तरी आम्ही जवळ आलो. तिचा स्वभाव, आणि ऑफिसमधील समंजस वागणे, आणि... तिचे सौंदर्य.... आणि मला कोण जाणे एक खोल पोकळी जाणवत होती माझ्या आयुष्यात.... काय की... समजत नव्हते नेमके काय.... आणि जेव्हा आम्ही एकमेकांजवळ आलो तेव्हा वाटले.... हीच कमी होती आयुष्यात.... आणि नाही सावरू शकलो आम्ही.... पण आम्हाला दोघांनाही याची कल्पना आहे..... आता मला योगिता, मुले..... आणि.. आणि रोहिणीची ही जबाबदारी टाळता नाही येणार...

आता कदाचित आईचं अजय चे मन वळवू शकेल असे आम्हाला वाटले... पण त्याने हेच सगळं आईना पण सांगितले.... सांगताना जरी तो आईशी नजर मिळवू शकला नाही तरी पण तो त्याच्या म्हणण्यावर ठाम आहे हे आईनाही जाणवले...

आणि त्या दिवसापासून आईंचे वागणे खूप च बदलले..... त्या खूप शांत राहू लागल्या.. अगदी अलिप्त... योगिता तर हरवून च गेली होती. घर ही पूर्ण शांत... ही शांतता नाही तर घुसमट होती... अजय आणि योगिताची... आई ंची पण... त्यांना समजत नव्हते असे का झाले ? कसे झाले ? आपण कुठे कमी पडलो... त्या आता वारंवार

एकटीने गावाला राहायला जायचे बोलू लागल्या.. रोहनला त्यांनी सांगितले की त्यांचे मन आता इथे रमत नाही.... रोहन ने आणि आम्ही सगळ्यांनी अगदी अजय नेही त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला.. पण त्या म्हणाल्या.... "नका काळजी करू... तिकडे गावाला सगळे नातेवाईक आहेच... आपण फोनवर नेहमी बोलू शकतो. वर्षातून एखाद्या वेळी भेटू शकतो... आता मी गावाला जाऊन राहायचे हे ठरवलेच आहे.. त्यात काही बदल होणार नाही"..... योगिताचे डोळे भरून आले. ती म्हणाली "आई मला इथे फार एकटे वाटेल तुम्ही गेल्यावर.. नका जाऊ तुम्ही. तुम्हीच असे केले तर मी काय करायचं "??

आई तिच्याजवळ जात म्हणाल्या... " योगिता, देव तुझी परीक्षा पाहतोय ग.. देवा बळ दे माझ्या योगिताला.. तुझ्याकडे पाहून जीव तुटतो ग माझा... पण जिथे आपलाच दाम खोटा, तिथे... एव्हढे बोलून त्यांना हुंदका फुटला.. नंतर स्वतःला सावरत त्या आमच्या सगळ्यांकडे बघत म्हणाल्या.. "जाऊ द्या मला.. नका अडवू.. मनात खूप प्रश्न दाटले आहे.. त्यांची उत्तरे शोधायची आहेत.. इथे राहून नाही सापडणार..... आता हळू हळू एकेका पाशातून पाय सोडवू द्या मला... आत्तापर्यंत देवाच्या च भरोशावर होते.. इथून पुढेही तोच सर्व सांभाळेल..

योगिता म्हणाली, " आई का अशी शिक्षा करताय आम्हाला ?

योगिता... मी जाते ते तुम्हाला किंवा मला शिक्षा म्हणून नाही जात आहे. माझे मन तिथे च रमेल आता.. योगिता, तुझ नवीन लग्न झाल्यानंतर चे रुप अजूनही माझ्या डोळ्यासमोर आहे, त्यावेळेस चे तुझे स्वप्नाळू डोळे अजूनही मला आठवतात... पण त्यातली स्वप्ने कदाचित मी नाही समजू शकले... अजय ही कदाचित नाही समजू शकला... नाहीतर असे झाले नसते... त्याने आणि मी ही तुला खूप दुखावले आहे... याचे परिणाम आम्हाला भोगावे लागतील.

आई, जे झालं ते झालं... तो विषय माझ्यासाठी संपला.. मी ही आता मुलांमध्ये मन रमावते आहे... माझेही काहीतरी चुकले असेल... जे देवाच्या मनात असेल तेच होईल.. तुम्ही आणि मी काहीच करू शकत नाही....

हा तुझा मोठेपणा आहे पोरी... सासूबाईंच्या डोळ्यात परत पाणी आले... स्वतःला सावरत त्या म्हणाल्या.. आज फक्त तुझ्यामुळेच देशपांडे घराण्याची अब्रू टिकून आहे... तुझ्या जागी दुसरी कोणी असती तर कदाचित एव्हाना माहेरी निघून गेली असती...

" आई आजच्या काळात अशी मी माहेरी निघून गेले तरी काही वावग नाही ठरणार... पण मलाच ते झेपणार नाही. एव्हढे आयुष्य काळाच्या मागे राहूनच काढले, आता एकदम झेपावणे मला जमणार नाही... तुम्ही तुमचा निर्णय घेऊ शकतात.. अजय स्वतःसाठी निर्णय घेऊ शकतात... पण.. मी नाही घेऊ शकत... आणि या निर्णय

अक्षमते ला कदाचित मीच जबाबदार आहे. तुम्हाला आता मी थांबवत नाही... तुम्ही जा गावाला...

सासूबाईंच्या जाण्याचा दिवस उगवला.. अजय, रोहन, आणि मी ही सुट्टी घेतली होती... अजय चेहऱ्यावर अपराधी पणा वागवत घरात वावरत होता.. पण तो काही ठोस निर्णय घेण्यासाठी असमर्थ होता.... मी आणि रोहन आईना पोचवायला स्टेशन ला जाणार होतो... घरात एक विचित्र शांतता होती.... जाण्याच्या आधी सासूबाईंनी सगळ्यांना जवळ बोलावले... अजयला त्या शांतपणे म्हणाल्या... तू काय गमावतो आहे ते तुला कळत नाहीये.. देव तुला सुबुद्धी देवो... मला म्हणाल्या

... सगळ्यांची आणि स्वतःची काळजी घे..... योगिता आणि मुलांना सांभाळ... आम्ही सगळे त्यांच्या पाया पडलो... घरच्या सगळ्या चाव्यांचा जुडगा त्यांनी योगिता ला दिला... म्हणाल्या... तू सगळं व्यवस्थित संभाळशील... माहिती आहे मला..... जसे काही त्या किल्ल्यांचा जुडग्याने त्या योगिता ला घराशी बांधून ठेवू बघत होत्या... चांदीच्या जड साखळीत अडकवलेल्या त्या किल्ल्यांनी ती आता या घराशी बांधली गेली होती.... दोन मुलांसाठी, घरासाठी, घरण्याच्या अब्रुसाठी.... कदाचित कायमचीच....

तिचे अस्तित्व आता जाता येता जाणवणार होते ते या किल्ल्यांच्या जुडग्या मुळे... त्याच्या छन.. छन... आवाजामुळे....

आई ची निघण्याची वेळ झाली होती.. कसे काय... काय माहिती... अचानक वादळ सुरू झाले...

आई, मी, रोहन रिक्षात बसलो.... खूप जोरात वारा एका विशिष्ट लयीत घुमत होता.. वाऱ्याचा एक गोल गोल भवरा तयार झाला आणि तो उंच उंच जाऊ लागला... रिक्षा वाल्याने रिक्षा वळवली... रिक्षा वळवता ना मला दिसले.. की... वाऱ्याने घरात धूळ जाऊ नये... किंवा वस्तू इतस्ततः विखरू नये म्हणून कदाचित अजय घराचा दरवाजा लावून घेत होता की काय.... की हा माझा भास होता.... डोळ्यातल्या पाण्यामुळे आणि वादळा मुळे मला काहीच स्पष्ट दिसत नव्हते... वाऱ्याचा जोर वाढत होता... त्या वाऱ्या मुळे आणि डोळ्यात परत परत येत असलेल्या पाण्यामुळे मी डोळे घट्ट मिटून घेतले.... योगिता च्या कमरेला अडकवलेल्या किल्ल्यांचा छन छन आवाज मात्र मला स्पष्ट ऐकू येत होता.......

समाप्त.

# अळू वडी

आज स्नेहाला ऑफिस मधून निघायला जरा उशीरच झाला नेहमीपेक्षा. खाली येऊन तिने स्कुटीला.. चल मेरी

डिअर... म्हणत स्पीड घेतला. वाटेत मंडईत थांबायचे होते. फ्रेश, टवटवीत भाज्या बघून ती पण दिवसभराचा

शीण विसरली. भाज्या घेतल्या आणि निघताना तिला अळूची पाने दिसली. मागच्या दोन्ही वेळेस च्या भेटीत बाबांनी अळुवडी खावीशी वाटते आहे असे म्हटलेले तिला आठवले..... आता निदान आठ दिवस तरी तिला बाबांकडे जायला जमणार नव्हते. तरी तिचे पाय थबकले... जाऊ दे, बाबांसाठी करून नेऊन द्यायला नाही जमले, तरी आर्यन, अरीन ला, तिच्या आठ वर्षांच्या जुळ्या मुलांना..... पण आवडतात खूप अळुवड्या.... तिने पटकन पाने घेतली आणि बाजार उरकता घेतला.

सध्या तिची खरच खूप धावपळ चालू होती. रोहित तीन महिन्यांसाठी जर्मनी ला गेला होता, ऑफिस, घरातले, आर्यन, अरिन चे खाणे पिणे, अभ्यास, शाळा यात तिची जबरदस्त दमछाक होत होती.

तिच्या स्कूटी ने वेग पकडला तसा मनाने पण... मनातल्या मनात ती घरी जाऊन करण्याच्या कामांची लिस्ट बनवू लागली, कूकर, स्कूल

युनिफॉर्म इस्त्री, दोघांनी केलेला पसारा आवरणे, त्यांच्या गोड तक्रारी आणि लुटुपुटी ची भांडणे निस्तरणे, सगळ्यात महत्वाचे म्हणजे... उद्या त्यांच्या शाळेत प्रोजेक्ट सबमिशन ची लास्ट डेट होती. त्यामुळे ते आरीन आर्यन कडून चिडचिड न करता, त्यांच्या कलकलाने करून घेणे.... ही एक जबरदस्त टास्क तिला आता पार पाडायची होती....

पण मध्येच तिला आता बाबांच्या घराकडे जाणारे वळण दिसले. तिने तिकडे फक्त एक नजर टाकली. वळवावी स्कूटी की.... जावे सरळ... दमलेला जीव आणि कामांची लिस्ट तिला पुढे जाणेच गरजेचे आहे हे समजावत होते.... पण तरी... अचानक तिने वळवलीच स्कूटी..

झाले..... आता निदान तास तरी मोडणार...

.... तिचे 80 वर्षांचे बाबा, 75ची आई एकमेकांच्या जोडीने राहत होते.

दोघांची वयपरत्वे होणारी चिडचिड, एकमेकांच्या तक्रारी आता तिला ऐकून घ्याव्या लागणार होत्या. तिची धावपळ समजून घेता घेता ती दोघे हे करणारच होते.... हममम.. तिने एक दीर्घ श्वास घेतला. तासाभरात निघू... असे स्वतःला बजावत ती आत शिरली... आईबाबांच्या चेहऱ्यावर टवटवी आली अचानक... एकमेकांच्या तक्रारी सांगता सांगता आईने सरबत दिले तिच्या हातात. अश्याच गप्पा चालू असताना बाबा म्हटले आजकाल अळू वडी खूप

खावीशी वाटते.... आईने थट्टेने म्हटले... बघ तुझ्या बाबांचे डोहाळे.... किती दिवस झाले म्हणते आहे करीन करीन... पण जमलेच नाही बघ...

तिला तिच्या भाजीच्या पिशवीतले पाने आठवले. आणि बाबा म्हणाले. स्नेहा,... ही म्हातारी काही खाऊ घालायची नाही मला अळू वडी... तू अस कर... आत्ता लगेच स्कूटी ला किक मार.... आणि जवळच्या स्वीटमार्ट मधून घेऊन ये बर माझ्यासाठी... तिने कपाळाला हात मारला... जरा 15/20 मिन गप्पा माराव्या तर हे काय सुचतंय बाबांना.... पण मग उठलीच ती... आणून देते लगेच जवळच आहे स्वीटमार्ट... देवून मग लगेच जाईन घरी..... आई पण ना..... कित्ती पान असतात आजकाल मार्केट मध्ये... आणायची, शांताबाई कडून करून घ्यायची... पण नाही.... तिने मनातल्या मनात जरा रागावत स्कूटी ला परत किक मारली.... तिच्या मनात येत होते.... उद्या मी करणारच आहे खर म्हणजे आळूवड्या.... पण सकाळच्या घाईत इकडे येऊन द्यायला नाही जमले तर..... आत्ता च देऊ दुकानातून.......

जवळ जवळ तिने 7/8 स्वीट मार्ट पालथे घातले..... मॅडम ढोकळा, सुरळीची वडी आहे... अळू वडी नाही.... प्रत्येक ठिकाणी स्कूटी साईड स्टँड ला लावायची, हॅण्डल लॉक करायची पर्स काढायची.... आणि नाही आहे.... हे वाक्य ऐकून परत उलट्या क्रमाने गाडी चालू

करायची आणि पुढे जायचे... 7/8 स्वीट मार्ट नंतर तिचे पेशन्स संपले.... उगीचच आज आईकडे आलो.... ती वैतागली....

त्यांच्याकडे परत जाऊन तिने वैतागत सांगितले... ओ बाबा... नाही मिळाल्या कुठेच तुमच्या आळुवड्या...

तिचा वैताग बघून बाबांचा चेहरा जरा अपराधी वाटायला लागला... तिने निरोप घेत, उद्या आणून देते आळू वड्या... असे म्हणत परत स्कूटीला किक मारली.... घरी पोचली तेव्हा अरीन, आर्यन ने तिची वाट बघत दुप्पट पसारा करून ठेवला होता... ती लगेचच फ्रेश झाली, दोघांचे आवरून त्यांचे ही चेहरे नीट केले, कूकर लावून दोघांना प्रोजेक्ट करायला बसवले.... पण अळू वडी काही तिच्या डोक्यातून जात नव्हती... कुठल्यातरी अनामिक

भावनेने तिने अचानकच अळू वड्या करायला घेतल्या... एकीकडे चीचं गूळ भिजत टाकले पाने सोलली, पानांवर मिश्रण पसरवले.... एकीकडे त्यांचे प्रोजेक्ट चे काम चालू होते... मध्ये मधे तिला तश्याच हातानी त्या दोघांना काहीतरी वाक्ये शोधून देणे, समजावणे, ओरडणे चालूच होते... आता त्यांच्या युनिफॉर्म ला इस्त्री रात्री उशिरा जागत करावी लागणार.... कारण आता केल्या आहेत आळु वड्या... तर आत्ताच जाऊन देऊन येते बाबांना.... नको उद्या सकाळी... सकाळची घाई पण काही कमी नसतेच... त्यापेक्षा आत्ताच जाऊन देऊन याव्यात.... तिला स्वतः चाच राग आला.... कशाला एवढे मागे लागायचे त्या वड्यांच्या..... पण सगळे विचार

बाजूला सारत... तिने आर्यन, आरीन चे प्रोजेक्ट संपवले... त्यांना जेवू घातले... आणि त्यांना मस्ती न करता नीट रहा असे सांगून परत अळू वड्या च्या डब्ब्यासकट तिच्या सखी ला.... स्कूटी ला किक मारली.... बाबा आई दोघेही आश्चर्य चकित..... अग.... कशाला एवढी धावपळ....

पण ते ऐकायला स्नेहा थांबलीच नाही.... लगेच परत तिच्या घराच्या दिशेने..... चल मेरी स्कूटी..... घरी येवून समाधानाने जेवली, मुलांना झोपवले..... युनिफॉर्म बघू उद्या सकाळी..... अगदी शांत झोप लागली तिला..... पहाटे फोन च्या रिंग ने जाग आली.........

शांता बाई बोलत होत्या पलीकडून..... स्नेहाताई..... तुमचे बाबा आत्ताच पहाटे गेले.... चहा घेतला नी नंतर लगेच च अटॅक आला बहुतेक त्यांना.... डॉक्टर येत आहेत... तुम्ही लवकर या..... आई पलीकडून रडत रडत बोलत होती.... स्नेहा.. तुझ्या वड्या अगदी आवडीने खाल्ला ग त्यांनी काल रात्री..... आणि आज.... बघ ना.... ये तू लवकर........

पण स्नेहाला रडू ही येत नव्हते..... एका अनामिक समाधानाने ती बाबांना अंतिम निरोप द्यायला जायची तयारी करू लागली......

समाप्त.

©© स्वप्ना थिटे.

# 3BHK
## ( three bedroom kitchen )

सौरभ एक मेहनती सायंटिस्ट खेडेगावातून येऊन कष्टाने शहरात जम बसवला. पुण्यातल्या एका छोट्याश्या कंपनीत ज्युनिअर सायंटिस्ट.

लोकांचे आयुष्य सहज सोपे करण्यासाठी हातभार लावणे सतत काहीतरी कसले कसले शोध लावणे संशोधन करणे... आणि याचा सौरभ ला रास्त आणि नम्र अभिमान...

वेगवेगळ्या टेक्नॉलॉजी, सतत अपग्रेड राहणे, सतत शोधक वृत्ती बाळगणे, नवनवीन शिकणे यामुळे तो न थकता कितीतरी जास्तच ताजातवाना होत असे. ही धावपळ ही त्याला एक ऊर्जा देऊन जात असे.

.. पण कंपनीत तो एक ज्युनिअर सायंटिस्ट. एका ग्रुप मध्ये काम करायचा, तिथेही चढाओढ.. म्हणजे चढायला लागले की ओढ..

त्याने स्वतःची संशोधनाची हौस भागवण्यासाठी त्याच्या घरच्या बेडरूम चे लॅब मध्ये रुपांतर केलेले.. छोटे छोटे संशोधन तिथेही चालत असायचे.

सुंदर, सुबक, आखीव, रेखीव कुटुंब त्याचे... मुलेही अगदी हुशार.. समजूतदार कर्तव्यदक्ष बायको.. हे सांगणे न लगे... जशी ही सुंदर

सुबक कुटुंबे नेहमी मध्यमवर्गीय च असतात.. तसेच हे ही कुटुंब मध्यमवर्गीय च... त्यांच्या आकांशा, स्वप्ने, आणि त्याचा पसारा... सगळेच मध्यमवर्गीय.. बायकोला आणि खर तर सौरभ ला ही आता 2bhk ची गरज भासू लागली होती. एका चांगल्या सोसायटीत 2bhk... एक रूम मुलांची एक राजाराणीची

, आलेले गेलेले पै पाहुणे… आत्ताच्या 1bhk मध्ये त्याने त्याच्या बेडरुम ची चक्क लॅब बनवलेली.. 2 bhk नाही खर तर 3 bhk गरजेचा कारण बेडरूम ची प्रायव्हसी लॅब मध्ये हरवलेली...

अशातच मोठ्या भावाचा प्रस्ताव गावचे घर विकून पैसे वाटून घेऊ.. भावाच्याही अश्याच काही गरजा.... बायको हरखली.. आता स्वप्न पूर्ण होणार... कारण आत्ताच्या त्याच्या पगारात 3bhk साठी न बसणारे लोन, बुकिंग अमाऊंट साठी लागणारी कॅश रक्कम, आणि जर गावाकडचे घर विकले तर कर्जही कमीच घ्यावे लागेल... कधीपासून ची ईच्छा पुर्ण होणार.... मार्ग सापडला... पण सौरभ नाराज... पूर्ण नाराज.. जिथे जन्मलो, खेळलो, जिथली हवा खाऊन, पाणी पिऊन जगायला शिकलो.. ते बंध कायमचे तोडायचे... कितीतरी गुंतावळ आठवणीची...

इकडे घरात सगळीकडे बोंबाबोंब.. आता आपण 3 bhk त राहायला जाणार.. मग त्याची बायकोकडे निष्फळ तक्रार... काय गरज 3 bhk ची... 2bhk च पूरे, माझ्या पगारात लोन ही बसेल...

आणि मग बुकिंग करताना लागणारी कॅश, पुढे मुलांच्या फिया, पुण्यातल्या जरा बर्या शाळेत मुलांना शिकवायचे तर.. एकेकाला जवळ जवळ लाखभर खर्च वर्षाला.... आणि मग महत्वाचं म्हणजे तुमची लॅब करता नाही येणार... मी नाही माझी बेडरूम देणार लॅब साठी... बायकोची लाडीक आणि खरी तक्रार..

बायकोने आणि भावाने समजावले... अगदी योग्य होईल गावचे घर विकणे... इथे नवीन, चकचकीत, ताजेतवाने घर.. मोठ्ठी सोसायटी, बाल्कनी तून दिसणारे गार्डन त्यात बागडणारी आपली मुले, स्विमिंग पूल, योगा मेडिटेशन हॉल... कितीतरी ऍमिनिटीज....

रोज भाऊजी वहिनींच्या गप्पा... कसे विकायचे, कितीला विकायचे, गावातल्या कोणाला हाताशी मदतीला घ्यायचे यासाठी... असे पण आई बाबा वारल्यानंतर वर्षातून एकदाच जातो आपण उत्सवाला.. तेव्हा होईल काहीतरी सोय गावातच... पण आता हे घर विकले गेले तर शहरातील स्वप्न साकार होणार.. सगळीच घडी नीट लागणार..

आणि तो दिवस आला. गावातल्या गणेश ने एक चांगले गिऱ्हाईक शोधून आणलेले. सौरभ आता यंत्रवत तयार झाला गावाकडे जायला. शेवटचे आपल्या घरी चार दिवस राहावे म्हणून त्याने सुट्टी घेतली.. बायको त्याची नाराजी ओळखून होती.. पण तरी ही तिने त्याच्या बरोबर गावाला यायची विनंती साफ धुडकावून लावली.. भाऊजी येणारच आहे व्यवहाराच्या दिवशी... तुम्ही जा पुढे.. इथे मुलांच्या शाळा, तोंडावर आलेली परीक्षा.. तेही खरेच म्हणा..

नाराज सौरभ गावाला हजर... गावाच्या वेशी पासूनच कितीतरी आठवणींचा मोहोळ... अगदी शहरातल्या केबल च्या जाळ्यासारखा.. एकमेकांना छेदणारे.... कुठली आठवण कशात अडकेल, कुठली मध्येच सुरू होईल.... कितीतरी एकमेकात अडकलेल्या आठवणींची शृंखला...

सौरभ ने अंगणात पाऊल ठेवले. शेजारच्या लक्ष्मी काकूंनी टवटवीत ठेवलेल्या तुळशीने त्याचे स्वागत केले. सौरभ येणार म्हणून गणेश ने घर अंगण स्वच्छ करून घेतलेले. जिव्हाळ्याची माणसे, चौकश्या.. सगळ्यांना हसून उत्तरे देत सौरभ पडवीत आला....

... झोपाळा.. परत आठवणींचा हिंदोळा... म्हटलेले पाढे, श्लोक, सगळ्या मित्रांनी एकत्र झोपाळ्यावर बसून केलेला आरडा ओरडा, भांडणे.. हा झोपाळा म्हणजे मित्रांचा अड्डा.. इथून गावाच्या नदीवर जाण्याआधी सौरभच्या आईकडून हक्काने मागितलेला खाऊ....

पडवी पार करून सौरभ बैठकीत आला. आई बाबांच्या फोटोने आडवले... हार घातलेले फोटो.. सगळ्या वस्तू जिथल्या तिथे... निर्जीव... पण वस्तू खरच असतात का निर्जीव ??.. सौरभचे सायन्स त्याला सांगत होते.. अणू रेणू नी बनलेली प्रत्येक वस्तू.. त्यांचा पण तर साचा असतो.. एकमेकात घट्ट गुंफलेल्या अणू रेणू नी बनते प्रत्येक वस्तू.... मग त्या वस्तू चेही काही उद्देश असते.. आपापले काम ती बिनभोभट पार पाडते.... तिलाही असतात ना रंग, रूप, आकार,.. आणि.. दुर्लक्षित, जपलेली, निरुपयोगी, उपयोगी अशी

विशेषणे... हे घर ही एक वस्तूच.... पण... वस्तू नाही वास्तू... वास्तू पुरुषाचे अस्तित्व सांभाळणारी वास्तू... आई वडील आजी आजोबा आपले पूर्वज यांच्या सहवासाने जिवंतपणा अनुभवलेली.. लहानपणापासून शरीराची च नाही तर व्यक्तिमत्त्वाच्या वाढीची ही साक्षी असणारी ही वास्तू... खरतर न उलगडणारे हे नाते.....

मग हा विकायचा निर्णय... विषण्ण मनाने सौरभ स्वयंपाक घरात आला.. गॅस च्या ओट्या जवळ चा आईचा वावर.. तिने झटून केलेल्या पदार्थांचा दरवळ आज ही जाणवला सौरभ ला....

घसा आणि डोळे कोरडे ठेवत सौरभ मागच्या आंगणात आला.. पेरू, चिकू, पपई,.... गावठी गुलाब, तगर, आणि चाफा.... इथेच शेजारच्या सुलू बरोबर मांडलेली लुटूपुटू ची भातुकली.. निरागस, निर्व्याज दिवस..

त्या जागेचे अस्तित्व श्वासातून शरीरात साठवायचा निष्फळ प्रयत्न करत होता सौरभ...

परत एकदा पडवीत येऊन झोपाळा गाठला. असेच काही क्षण झोपाळा आणि तो झुलत होते... आठवणी साठवणी न चा हिंदोळा... एवढ्यात मोठ्या भावाचा फोन... काहीतरी अर्जंट निघालेले काम... तूच व्यवहार पूर्ण कर अशी सूचना.... हताश सौरभ अनिच्छेने व्यवहार करायला तयार झाला. दुसऱ्या दिवशी गणेश गिऱ्हाईक ना घेऊन आला त्यांना ही वास्तू अतिशय आवडलेली.. सांगितलेल्या किमतीच्या आसपास च व्यवहार होणार.. शहरातील

स्वप्न पूर्ण होणार.. कर्ज कमी काढावे लागणार 3bhk sathi.... इथल्या आठवणींचे अस्तित्व आता फक्त आठवणीत च राहणार....

आता व्यवहार करूनच टाकू ते ज्या किमतीला मागतील देऊनच टाकू... त्याने मनाशी ठरवले... आता वार्षिक उत्सवाला ही येणे नाही.. आपल्या वास्तूत न राहता लांब परक्या पाहुण्या सारखे राहणे नाही जमणार... संपले ऋणानुबंध... इथपर्यंतच होते... पुढच्या पिढीपर्यंत पोचेलेच नाही... गरजही नाही...

पाव्हणे परत एकदा घराला चक्कर टाकून झोपाळ्यावर बसले. खरेदीखत कधी करायचे बोलणी सुरू झाली. एवढ्यात गणेश ला सौरभ च्या बायकोचा फोन... गणेश ताडकन उठून बाहेर अंगणात बराच वेळ बोलत... शेवटी नाराज होऊन तो परत आला. सौरभला आतमध्ये बैठकीत घेऊन गेला.... वहिनींनी आणि दादांनी व्यवहार थांबवायला सांगितले आहे.... तुम्ही जे एक विशिष्ठ प्रकारचे अगदी बोटावर मावणारे वायरलेस चार्जर बनवले होते त्याचे पेटंट घेतले आहे वहिनींनी.. तुमच्या नावावर... ते मान्य होऊन आता त्याचे सर्व हक्क आणि त्याबरोबर येणारी करोडोंची रक्कम आता तुमचीच... त्या म्हणाल्या... आता या व्यवहाराची गरज नाही..

सौरभ इतका गोंधळून गेला की हा आनंद कसा व्यक्त करावा हेच त्याला कळत नव्हते... सौरभ चा प्रफुल्लित उजळेलेला चेहरा पाहून गणेश ही आपले नुकसान विसरला....

कसातरी सौरभ ने बायकोला फोन लावला... पलीकडून बायको म्हणत होती... मुद्दामच गणेश भावजीना फोन लावला.. तुम्हाला आनंदात व्यवहार रद्द करणे पण नीट सुचले नसते... मी ओळखून होते तुमच्या भावना... पण आपल्या आणि भावजी च्या इथल्या अडचणी पण होत्याच ना... आता आपण भाऊजी ना पण मदत करू.. आणि आपला 3 bhk पण घेऊ.. मी आणि भाऊजी खूप दिवस या पेटंट साठी प्रयत्न करत होतो म्हणून तर आत्ता आम्हाला जमले नाही यायला... काय मग करोडपती पेटंट धारक... कसे वाटते आहे ?... आता आपलं घर आपलेच राहणार... नका उदास होऊ... मुलांची परीक्षा संपते आहे उद्या... आम्ही सगळेच येतो तिकडे … छान सेलिब्रेट करू...

चौफर पसरलेला आनंद आणि बायकोबद्दल अभिमान आणि कृतज्ञता.... सौरभ ला शब्दच सुचत नव्हते....

आनंदात माणसाला शब्द सुचण्यासाठी पण काहीतरी संशोधन केले पाहिजे राव.......

समाप्त ©®

# पिरिअड्स ( पाळी )

सानिका वय वर्षे तेरा, मे महिन्याच्या सुट्टी त मामाकडे आठ दहा दिवसांसाठी आली. खर तर आई नकोच म्हणत होती. पण तिने हट्ट धरला मला सोहम बरोबर खेळायचे आहे, त्यांच्याकडे किती छान झोपाळा आहे.. मग आईने पाठवले. सानिका, आठ दिवसांनी मी घ्यायला येते मग तेव्हा हट्ट ना करता गुपचूप यायचे.. ok ?

मग मामाकडे गेल्यावर तिचा आणि तिचा सोहम चा धुडगूस सुरू झाला. सानिका मामा मामीची खूप लाडकी.. ती आली म्हणून आईस्क्रीम, आंबे, मूवी, पिकनिक असे जोरदार कार्यक्रम ठरले. चार दिवस कसे गेले कळलेच नाही. आणि एक दिवशी सोहम बरोबर पत्ते खेळताना अचानक तिचा फ्रॉक ला मागे रक्ताचे डाग पडले. पत्यां चा डाव झाल्यावर ती झोपाळ्यावर बसायला जाताना सोहम ला ते दिसले. तिच्या ते लक्षात आले नाही. पण तिला जाणवत होते की सकाळपासून बारीक असे पोटात दुखतय.. पण त्याकडे दुर्लक्ष करून ती खेळत राहिली. सोहम, तिचा लहान मामेभाऊ, त्याने ते पाहिले आणि जोरात ओरडला.. सानिका.. रक्त.. आई सानिकाला लागले खूप रक्त येतंय, मामी जवळच होती.. काय ग.... काय झालं ?... पण लगेच मामीच्या ते लक्षात आले. ती सोहम ल म्हणाली काही काळजीच कारण नाही सोहम तू जरा अमोल कडे जाऊन

शिवायला टाकलेले कपडे घेऊन ये. मला जरा सनिकाशी बोलायचे आहे.

सानिका तुला पाळी आली आहे वाटते. काही त्रास होतोय का तुला ? आधी कधी झालं होत का असे ? तुला माहित आहे का या बद्दल ? आईने ह्याबद्दल सांगितले आहे ना तुला ?

पाळी ?? हा शब्द मी ऐकला आहे, मामी,.. खूप बायकांच्या कडून.. पण म्हणजे काय असतं ते ?.... मला पोटात जरा दुखतंय.. पण रक्त कसे आले त्यामुळे ?? सानिका रडवेली झाली.. तिला कळेना की आपल्याबरोबर काय होतंय ?

मामीने तिला जवळ घेतले. आणि तिला प्याड कसे वापरायचे हे सांगून दिले आणि म्हणाली तू आधी कपडे बदल मग मी तुझ्याशी नीट सगळं बोलते. सानिका कपडे बदलून आली.

मामी म्हणाली...

घाबरु नकोस काही वाईट झालेले नाहीये. मी तुला सगळं नीट समजावून सांगते. पण त्याआधी मला सांग की तुझ्या आईने तुला याबद्दल काय सांगितले आहे ?

आईने मला याबद्दल काहीच नाही सांगितले.. पण ती एकदा मावशी बरोबर बोलत होती की.... सानिकाला आता कधीही कावळा शिवेल.. मग तिच्यावर लक्ष ठेवावे लागेल... मुलींना पाळी आली म्हणजे नवीन जबाबदारी... डोक्याला ताप नुसता.... असे आई

बोलली होती... मग मी आईला बोलले की मला पाळी येणार आहे का ?... आणि पाळी येणार म्हणजे काय ग ?.. आणि आली तरी तू मुळीच काळजी नको करू... मी काही तुला त्रास नाही देणार... पण हे ऐकून आई मला ओरडली.

म्हणाली येईल तेव्हा बघू.... आत्तापासून नको माझे डोके खावू..

आणि सानिका रडायला लागली... तिला जवळ घेत मामी म्हणाली.

अग रडण्यासारखं काही नाही यात... उलट तू आता मोठी होशील, तू तर हुशार आहेसच, स्वतःची व्यवस्थित काळजी घ्यायची... हे तर देवाने आपल्याला दिलेले वरदान आहे... मी सगळं समजावून सांगते तुला.... एव्हढ्यात सानिकाच्या आईचा सहजच म्हणून फोन आला.. मामी ने हे सगळे सांगितल्यावर सनिकाची आई म्हणाली मी लगेच सानिकाला घ्यायला येते..... मामीला वाटले की ह्याक्षणी तिला आपल्या मुलीबरोबर राहायचे असेल म्हणून ती म्हटली की ओके या तुम्ही.. काळजी करू नका ती हुशार आहे आणि मी तिला समजावते...

मग सानिकाला जवळ बसवून मामी ने तिला सोप्या शब्दात पाळीतील स्वच्छता आणि काळजी, आहाराचे महत्व असे काही काही सांगायला सूरवात केली.

सानिका ला खूप प्रश्न पडले होते.. पण मामी.... आता मला खूप त्रास होणार कारण की मला सू तून रक्त पडते आहे...... मला तर कावळा शिवलाच नाही.

तरी असे कसे झाले..... मला खूप भीती वाटते आहे मामी...

हे बघ तुझी आई आली की आम्ही तुला माझ्या एका मैत्रिणी कडे घेऊन जाऊ.. ती सगळे तुला समजावून सांगेल... काहीच काळजी करू नकोस हे सगळ्या स्त्रियांना होत असते. अगदी तुझ्या आईला, मला, आजीला.. महिन्यातले चार दिवस असे होते त्याने आपल्याला काही त्रास होत नाही उलट असे दर महिन्याला होत असेल तर आपले आरोग्य उत्तम राहते.

सानिकाला तिने ओटीपोट शेकायला गरम पाण्याची पिशवी दिली.

एव्हढ्यात सानिकाची आई आली. सानिका ची आई नंदा आणि मामी शुभा दोघी नणंद भावजय साधारण एकाच वयाच्या. नंदा आणि मोहन दोघे बहीण भाऊ... आई वडील दोघेही एका अपघातात वारले होते. त्या घटनेला आता पाच वर्ष होत आली. शुभा ने तिचा नवरा मोहन आणि नणंद नंदा ला यातून सावरण्यात खूप मदत केली. नंदा आणि नंदाची आई म्हणजेच शुभाची सासू, दोघीही देवभोळ्या सगळी व्रतवैकल्ये भक्तिभावाने करणाऱ्या. आज च्या काळातही सोवळे शिवाशिव पाळणाऱ्या.... शुभाने सासू आणि नणंद नंदाला कधी उलट उत्तर दिले नाही सासू सासरे होते तेव्हा शुभा ही बाजूला बसायची पण मनातून तिला हे काही पटत नव्हते. पण

ती म्हणायची जाऊ दे कुठे वाद घालत बसू. ते अपघातात वारल्यानंतर तिने हे चार दिवस बाजूला बसणे सोडून दिले. नंदाला ही अगदी तिच्या आई सारखीच सासू मिळाली. नंदाच्या घरी चार दिवस बाजूला बसावेच लागे. शुभा ने यात कधी स्वतःचे मत व्यक्त केले नाही पण तिच्या घरी मात्र ती यातले काहीच पळत नव्हती.

सानिका ला पहिल्यांदा च आज पाळी आली. नंदा आनंदली आणि धास्तावली देखील.... कारण आता सनिका ची शाळा सांभाळून तिला बाजूला बसवावे लागणार होते. ती शुभा कडे आली आणि तिने शुभा आणि सानिका ला जवळ जवळ बसलेले पाहिले आणि एकदम ओरडली... सानिका मामीजवळ नको बसुस.. दूर हो पाहिले.. सानिका कावरी बावरी होऊन दूर झाली. शुभा म्हटली रिलॅक्स नंदा तिची पहिलीच वेळ आहे.. खरतर तू तिला आधीच सगळी कल्पना द्यायला हवी होती. म्हणजे ती घाबरली नसती एव्हढी... जाऊ दे... आता तिला खूप प्रश्न पडले आहे... तर आपण तिला सगळे समजावून सांगू. काय ?

हो हो... आणि नंदाने सानिकाला सांगायला सुरुवात केली.... हे बघ सानिका आता तू मोठी झाली असे रक्त येणे म्हणजेच पाळी येणे. असे तुला दर महिन्याला होईल.... या दिवसात तू बाजूला एकाच ठिकाणी चटई वर बसायचे आणि तिथेच झोपायचे, घरात कोणाला शिवायाचे नाही, देवाजवळ तर मुळीच जायचे नाही. या दिवसात दूध ही प्यायचे नाही. आपले कपडे आपले भांडे स्वतः धुवायचे. मी

किंवा आजी तुला ताट वाढून देईल पण ते आम्ही लांब ठेवू मग तू ते घेवून जेवायचे. चवथ्या दिवशी डोक्यावरून आंघोळ झाल्यावरच घरात तू सगळ्या वस्तूंना किंवा माणसांना शिवू शकते... समजलं ???

सानिका अजुनच रडवेली झाली..... म्हणजे मी तुझ्याजवळ किंवा आजी आजोबा जवळ येवू पण नाही शकणार ? पण माझे दप्तर पुस्तके तर सगळे आपल्या रूम मध्ये असतात. मग ते मी माझ्या बेडवर ठेवू का एव्हढे सगळे... मग मला झोपायला तर जागाच नाही राहणार. आणि मला तर दूध खूप च आवडते... मी शाळेत जाताना रोज पिते.... आता का नाही प्यायचे ?

आणि हे रक्त फक्त मुलींनाच येते का ? मुलांना का नाही ? आणि आपोआपच येते आणि आपोआपच थांबते का चार दिवसांनी... ? पण मग मी का म्हणून बाजूला बसायचे ??? मी नाही बसणार.... सानिका रागाने म्हणाली...

नंदा ने तिला समजावत सांगितले की... हे बघ या चार दिवसात सगळे अशुद्ध रक्त तुझ्या शरीरातून जाणार... म्हणजेच तू अशुद्ध, अपवित्र असणार.. अशी अशुद्ध असताना तू जर कोणाला शिवलीस, देवाजवळ गेलीस तर देवबाप्पा खूप रागावेल. आपले घर अशुद्ध होईल... म्हणून हे सगळे पाळावे लागेल. शहाणी ना तू ? मग मोठ्या माणसांचे ऐकायचे... आणि हो... बेड वर नाही खाली चटई वर झोपायचे... तुझे या दिवसातले आंथरून पांघरुण वेगळेच

ठेवायचे. पुढच्या वेळेस तेच वापरायचे.... आणि हो.... आता जरा हुंदाडणे कमी कर. मोठी झलियेस तू आता. समजलं ?

म्हणजे मी काय अशुद्ध असणार या दिवसात ? म्हणजे मी असे काय केलंय ? म्हणून देव मला असे बाजूला बसवणार ? आणि शाळा ? सानिका ला खूप मोठा प्रश्न पडला...

अग शाळेत जाऊ शकते. काय करणार ? शाळेत, कामाला जावेच लागते बायकांना... त्याला काही पर्याय नाही... पण हो... कुठे काही पूजा, हळदीकुंकू, किंवा इतर कार्यक्रम असेल तर मात्र जायचे नाही हा. देवाला हे सगळं नाही चालत. आणि फक्त चार दिवसांचा च विटाळ असतो तो. नंतर सगळं शुद्ध, पवित्र होते. अग सगळ्याच मुलींना, बायकांना असे बाजूला बसावे लागते. त्यात काही वाईट नाही उलट चांगलेच असते हे पाळलेले. नंदा चे बोलणे समजून घ्यायचा प्रयत्न करत सानिकाने शुभा ला विचारले..

मामी, तुला पण असे बाजूला बसावे लागते का ?

नाही ग... मी नाही पाळत हे सगळे. माझ्या मते सगळे दिवस सारखेच.. हो पण जर मला त्रास होत असेल, पोटात कमरेत दुखत असेल तर मात्र आराम करते... कसे असते ना या चार दिवसात आपल्या गर्भाशयात काही घडामोडी घडत असतात त्यामुळे.....

पण शुभाला पुढे नंदाने काही बोलूच नाही दिले.. एकदम ओरडत तिने शुभा ला गप्प बसायला सांगितले... शुभा तू काहीबाही माझ्या

सानिकाच्या मनात भरवू नकोस.. हे असले सगळे काही आत्तापासून सांगायची काहीच गरज नाहीये... वेळ आल्यावर आपोआपच तिला कळेल जसं पाण्यात पडल्यावर पोहता येते तसेच आहे हे... काही नको आत्तापासून सगळी माहिती..

आणि हो.. देवाधर्माच्या बाबतीत खेळ नको.... आमच्याकडे असे नाही चालत. तुला काय... कोणाचा धाक नाही म्हणून तू मोकळी सुटलीयेस.

.. माझी आई होती तोपर्यंत सगळं सांभाळून होती. आणि मोहन ला तर तू पुरते गुंडाळून ठेवले आहे.

शुभा चा चेहरा पडला. तिला हे ऐकून खूप वाईट वाटले. सानिका तर आईचं हे रागावणे पाहून घाबरून शांत उभी होती.

मी सानिकाला घेऊन जाते शुभा. सनिकाचा पाचव्या दिवशी तिची पूजा करेल, ओटी भरणे ला ये तेव्हा... असे रुक्ष पणे बोलून नंदा सानिकाला घेऊन गेली....

हतबुद्ध होऊन शुभा नंदा आणि सानिका निघून गेल्या त्या दिशेने पाहत राहिली. संध्याकाळी तिने मोहन ला हे सगळे सांगितल्यावर तो म्हणाला दुर्लक्ष कर... आपल्या हातात काही नाही.. ताई आणि तिच्या सासू ला आपण काही सांगायला गेल्यावर ते काही ऐकणार नाही... त्यामुळे तू काही बोलू नकोस.

पाचव्या दिवशी शुभा नंदाकडे सनिकासाठी एक छानसा ड्रेस घेऊन गेली. एक खुर्ची मस्त फुलांनी सजवली होती त्यापुढे टेबल वर फळे फुले ओटीचे सामान सगळे मस्त सजवून ठेवले होते. नंदाला ते बघून खूप छान वाटले. खरचं हा महत्वाचा टप्पा असतो स्त्री च्या आयुष्यातला आणि पहिल्या वेळी तिला आत्मविश्वास देण्यासाठी, तिला स्त्रीत्व समजून देण्यासाठी अशी पूजा करणे खूपच छान... असे शुभा मनात म्हणाली...

प्रसन्न वातावरण होते. नंदा आलेल्या पाच सवाष्णी साठी नाष्टा चहा करत होती. नंदाच्या सासूबाईंनी शुभाचे छान स्वागत केले... तिच्याशी गप्पा मारू लागल्या... म्हणाल्या... चला आता सानिका न्हाती धुती झाली.. एक काळजी मिटली... पोर तशी समजूतदार हो... सगळे काटेकोर पाळले... कुठे शिवशिव नाही केली... हट्ट केला थोडासा माझ्या जवळ झोपण्यासाठी.. पण अजून लहान आहे ती....... तिला सगळे पवित्र, अपवित्र समजून सांगितले... समजेल हळू हळू... असे म्हणत त्यांनी सानिकाला बाहेर बोलावले...

सानिका एक छानसा ड्रेस घालून व्यवस्थित ओढणी घेऊन आली. शांतपणे खुर्चीवर येऊन बसली. मामीला पाहून तिच्या चेहऱ्यावर हसू आले. मामीने तिला जवळ घेत कशी आहेस माझी सोनू असे विचारल्यावर.. सानिका म्हणाली मी छान आहे मामी... काल डोक्यावरून आंघोळ केली. मग तेव्हापासून मी घरात कुठेही हात

लावू शकते.. आता मी मोठी झालिये.. आजीने मला सगळे नियम समजावून सांगितले...

शुभा ने स्मित केले... सगळ्या सवाष्णी नी सानिका ची ओटी भरली. तिच्यासाठी आणलेल्या भेटवस्तू दिल्या. आणि अजून काही नियम सांगितले... आता नीट पाळत जा. आजीचे ऐक, शिवाशिव होऊ देऊ नकोस.... चांगले कपडे घालत जा... आणि प्रत्येकीला जसे जसे महत्वाचे वाटेल ते ते सगळे कसे काटेकोर पाळले पाहिजे.. कसे नियम मोडले नाही पाहिजे.. देवाला काय चालते.. काय नाही चालत... यावर चर्चा रंगात आली. आजींनी सानिका आणि तिच्या बरोबरीच्या नेहा आणि दिव्या ला दुसऱ्या रूम मध्ये जाण्याची परवानगी दिली... मुली दुसऱ्या रूम मध्ये जाऊन गप्पा मारू लागल्या.

सगळ्या स्त्रिया आपल्याला माहिती असलेले नियम एकमेकींना सांगत होत्या... आमच्याकडे असे.. आमच्याकडे तसे... असे केले तर चालत नाही.. तसे केले तर चांगले असते... वगैरे वगैरे... एक म्हणत होती माझ्या नवऱ्याला या दिवसात माझ्या हातचा स्वयंपाक अजिबात चालत नाही.. ते बाहेर जेवतात. पण मला मुले आणि माझ्यासाठी करावाच लागतो... एक म्हणत होती या दिवसात चुकूनही देवाचा प्रसाद खाऊ नये... चालत नाही देवाला.... एक म्हणत होती.. मला तर खूप त्रास होतो अलीकडे.. खूप अशक्तपणा वाटतो... आणि खूप चांगले चुंगले चार वेळा खावेसे वाटते... पण

माझ्या सासूबाई फक्त दोनच वेळेस ताट वाढून देतात... एक म्हणत होती... मला वरच्या कोठी रूम मध्ये झोपावे लागते... मला अलर्जी आहे खर तर धान्याच्या धुळीची... पण मग ॲलर्जी च्या गोळया घेते.. काय करणार ?? एक म्हणत होती... अग... नेहमीची कामे परवडली. पण शिवायचे नाही म्हणून बाजूला बसल्यावर भांडी घासणे, धान्य निवडणे अशी कामे करावीच लागतात... करण्याबद्दल काही नाही ग.. पण माझी नेमकी कंबरच दुखत असते या दिवसात... बसवतच नसते... पाठीवर झोपली की बरे वाटते... पण कामे टाळून कसे चालणार...

एक म्हणाली... अग नेमकी मागच्या वर्षी गोरी गणपतीत माझी पाळीची तारीख होती.... मग काय पाळी पुढे जाण्याच्या गोळया घेतल्या आणि वेळ निभावली... ती डॉक्टर पण म्हणत होती.. या सीझन ला खूप जणी येतात या गोळया घ्यायला......

सगळयांच्या गप्पा रंगात आल्या होत्या... कितीही झाले तरी देवाला शीवशिव चालत नाहीच या विषयावर सगळयांचे एकमत होते.. आपण कसे त्रास सहन करून काटेकोर पणे सगळे पाळतो याचे समाधान त्या एकमेकांबरोबर वाटत होत्या...

शुभा यात काहीच बोलू शकत नव्हती... तिला कंटाळा आला ती हळूच तिथून उठून मुलींच्या रूम मध्ये गेली... मुली गप्पा मारण्यात रंगून गेल्या होत्या... नेहा म्हणत होती... माझी आई पण म्हणत होती

की, नेहा, तुला पण आता कधीही पाळी येऊ शकते.. मला सांग ना.. काय असते हे..

दिव्या, नेहा.. सानिकाने बोलणे मन लावून ऐकायला लागल्या..... सानिका सांगत होती... अग... या चार दिवसात आपण अपवित्र असतो... आपल्या वर्गातली रिया एकदा मला सांगत होती.. पण मला खोटेच वाटले... पण आत्ता मला समजले की खरोखर असे असते... पण जाऊ दे ना... या चार दिवसात आईने मला काहीच काम सांगितले नाही... अभ्यास करून कंटाळा आला की मी मस्त पाहिजे तेव्हढा वेळ टीव्ही बघितला, मोबाईल वर कितीतरी गेम खेळली.. खूपच मज्जा.. कोणी काहीच बोलले नाही... आणि बाबांनी माझ्यासाठी माझ्या आवडीची भेळ, चॉकलेट, केक पण आणून दिली... फक्त आपण कोणाला आणि कुठल्या वस्तूला शिवायाचे नाही... नाहीतर विटाळ होतो असे आजी म्हणत होती... देवाला चालत नाही म्हणे असे... म्हणून तेव्हढे फक्त पाळावेच लागते... बाकी काही नाही.....

शुभा स्तब्ध होऊन हे ऐकत होती.... सानिका अगदी तिच्या आईसारखी नंदासारखी.. बोलत होती.... अजून एक नंदा तयार होत होती... तिच्या बरोबर अजून अशा कितीतरी नंदा तयार होणार होत्या....

समाप्त

# वर्जिन. (virgin )

## भाग एक

मीरा ने संध्याकाळी देवाजवळ दिवा लावला. डोळे बंद केले आणि खूपवेळा जसा आईचा चेहरा तिच्या डोळयासमोर येतो तसा आजही आला. तशीच ती २ मिन बसून राहिली. आई तिच्याकडे बघून शांत, मंद हसत होती. मीराला वाटले काहीतरी सांगायचे आहे आईला. एवढ्यात मेसेज टोन वाजला. तिने हात जोडून तिची प्रार्थना आटोपती घेतली आणि मोबाईल घेतला.

Hi, ready for today's meeting?

Yes.... time, place ?

10. 00 at mouryan international.

Ok

अजून बराच वेळ होता. तिने तिच्या आवडीच्या गजल लावल्या. शांताबाई सगळी कामे आटपून घरी निघाल्या.

मीरा मॅडम पराठे करून ठेवले आहे. कॅसररोल मध्ये, गरम करून घ्या.

ठीक आहे जा तुम्ही शांताबाई... आणि हो... जरा तूप कमी लावत जा हो पराठ्याना... तुम्हाला माहित आहे ना.. मला स्वतःची किती काळजी घ्यावी लागते ते. तुपाने अक्षरशः लतपतलेला असतो पराठा.....

तिच्या कुरकुरीकडे हसून दुर्लक्ष करत शांताबाई म्हणाल्या... अव कायबी व्हत नाही साजूक तुपाने... जरा खात जावा चांगलं चुंगल जीवाला.... आणि हो... आज तुम्हाला जायचे आहे ना रात्री काळजी घ्या.... अगदी मनापासून बोलून शांताबाई निघाल्या.... त्यांची काळजी, आणि असहायता तिला जाणवली. गेली 5 वर्षे त्या तिच्याकडे कामाला होत्या. तिची आवडनिवड जाणून होत्या. अगदी आई असती तर तिने ही असेच खाऊ घातले असते आपल्याला.... मीराला आईच्या आठवणीने भरून आले. ती बाल्कनीत आली समोरच फेसळता समुद्र... हळू हळू दिवे लागत होते. रस्त्यावरचे, घरातले,... मीरा मात्र अंधारातच बाल्कनीत थांबली. कितीतरी वेळ ती दुसऱ्यांच्या घरातल्या लुकलुकणारे दिवे बघत होती.

आज सगळे ऐहिक सुख मीरा पुढे हात जोडून उभे होते. आलिशान फ्लॅट, उंची कपडे, उचभ्रू लोकांमध्ये उठबस, पुरेसा बँकबालन्स....

एवढे पैसे होते तिच्याकडे की तिने एक छोट्या मुलांसाठी एनजीओ चालवायला घेतला. की जो आधी रोझी चालवायची. रोझी च्या अकाली निधनामुळे परत एकदा तिला आयुष्याचे कोडे पडले होते.

जसे आयुष्य पुढे येईल तसेच ते जगत राहणे हेच खर... यावर आता तिचा ठाम विश्वास बसला. कसाही असला तरी रोझीचा आधार होता मीराला. रोझीचे एनजीओ आता मिराचा आधार बनला होता. काहीतरी चांगले ही आहे आपल्या आयुष्यात असे तिला या एनजीओ तील लहान मुलांमध्ये वाटत होते. त्यातला बराचसा खर्च ती स्वतःच उचलत असे. NGO चा स्टाफ तिला आदराने मीरा मॅडम म्हणत असे. पण ती जाणून होती एक दीनानाथ काका सोडले तर बाकीच्यांच्या मनात तिच्याविषयी काडीचाही आदर नाही आहे. फक्त दीनानाथ काका तिची परिस्थिती ओळखून होते. त्यांना तिच्याबद्दल सहानभुती होती. ती बाकीच्यांकडे दुर्लक्ष करायची. तिला बाकीच्यांशी काही घेणे देणे ही नव्हते. कठोर शिस्त तिने तिच्या स्टाफ ला लावली होती. खरतर घाबरून असायचा तिचा एनजीओ चा स्टाफ तिला. पण तिथे आलेल्या लहान मुलांना मात्र ती खूप जीव लावत असे. आता हेच तिचे जग होते.

रिमा चा, तिच्या लहान बहिणीचा फोन अधून मधून येत असे पण फक्त जुजबी चौकशी करून ती तो संपवत असे. नेहमी रिमा तिच्या आर्थिक

परिस्थितीचे रडगाणे गात असे. असे एक दोन चार वेळा झाल्यावर मीरा तिला काही पैसे पाठवून देत असे. फक्त एकदाच तिने रीमा जवळ तिच्या मुलांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली होती. मी तिकडे येते तुझा संसार, तुझी मुले बघायची आहेत मला किंवा मुलांना

घेऊन तू इकडे ये मुंबई दाखवायला.... असे तिने रीमाला सुचवले होते... पण मोठ्या शिताफीने रीमाने ते टाळले असे मिराच्या लक्षात आल्यावर... मीराला अत्यंत वाईट वाटले... नंतर फक्त कर्तव्य म्हणून ती रीमाशी अगदी जुजबी बोलायची फोनवर... आणि रिमाला तर फक्त पैसे दिसत होते मिराचे... मन नाही.... मिराही हे जाणून होतीच. नुकतीच तिशी ओलांडली होती मिराने. भरपूर पैसा सोडून बाकी सगळी गरिबीच अनुभवत होती पण ती. एनजीओ तल्या मुलांचे प्रेम मात्र होते तिच्याकडे आणि कदाचित त्यांच्या आशीर्वादाने तिच्या आयुष्यात काहीतरी चांगले होईल का भविष्यात ??? पण सध्या तर सगळा अंधारच होता...

नऊ वाजले तसे मीरा आत आली जेवण करून पार्टीसाठी तैयार व्हायला लागली.

कधीही कुठल्याही पार्टीत शक्यतोवर खायचे नाही. असे तिने ठरवले होते.

ब्राऊन सॅटिन ची साडी त्याला बारीक खड्यांची बॉर्डर, बॅकलेस, स्लीवलेस ब्लाऊस, हलकासा मेकअप, ब्राऊन लिपस्टिक, लांबसडक केसांना तिने फक्त एक साईड क्लिप लावून मोकळेच सोडले आणि एका खांद्यावरून केस पुढे घेतले. हाय हिल्स सोबत एक ब्रँडेड मॅचींग पर्स.

आरशात बघतांना तिला वाटले.... कोण आहे ही मीरा... नक्कीच आठ नऊ वर्षांपूर्वीची मीरा नाही...... की जी साधी सरळ भोळी

होती.... ती तर केव्हाच हरवली या मुंबईत.... किंवा मेलीच.... आता ही फक्त एक सुंदर काया.... की जीचे उद्देश्य काहीच नाही. पैसे ही तिला स्वतःसाठी नको तर मुलांसाठी कमवायचे आहे... आता या शरीराचा हाच उपयोग.... हेच आयुष्य.... पण तरीही मीराचे डोळे भरून आलेच.... का ???? अजूनही तिला आशा वाटत होती काही चांगले घडण्याची?.... कसे शक्य आहे ???

... ती ज्या पार्टीत चालली होती तिथे नेहमीप्रमाणेच तिला कोणालातरी खुश करण्याचे अगदी भरपूर पैसे मिळणार होते.... तिने स्वतःला परत एकदा समजावले..... आता हेच आहे तुझे आयुष्य... विसर त्या आठ वर्षांपूर्वीच्या मीराला....

तैय्यार झालेली मीरा तिच्यासाठी पाठवलेल्या गाडीत येऊन बसली. आता हाय सोसायटीतील सो कॉल्ड अती प्रतिष्ठित लोकांमध्ये वावरायचे होते तिला. किळस आली तिला सगळ्याची... पण आता सगळे विचार झटकत तिने खिडकीतून बाहेर दिसणाऱ्या आणि धावणाऱ्या दिव्यांकडे आपले लक्ष केंद्रित केले. दिवे धावत होते, रस्ता धावत होता. मीरा... मीरा फक्त या सगळ्या मागे ओढली जात होती........

© स्वप्ना थिटे.

# भाग २

फक्त १७ वर्षांची होती मीरा जेव्हा तिने मुंबईत या मायानगरीत पाऊल ठेवले. तिचा दूरचा मामा म्हणजे तिच्या सावत्र आईचा कुठलातरी चुलत भाऊ, तिचे वडील वारल्यावर जवळ जवळ महिनाभर त्यांच्या घरी मुक्काम ठोकून होता. रोज आईचे आणि त्याचे काही खलबत चालायचे, मुंबईला फोन व्हायचे. वडिलांचा मिरावर फार जीव. त्यांना मीराला आणि रीमाला खूप शिकवायचे होते. पाचवी नंतर त्या दोघी जवळ जवळ २० km दूर तालुक्याच्या गावाला रोज जाऊन येऊन शिकत होत्या.

मीरा ने ठरवले होते खूप शिकायचे नोकरी करायची वडिलांना सुखात ठेवायचे. मीरा आणि रीमाचे छान पटायचे. लोक म्हणायचे वाटत नाही हो सावत्र बहिणी. आईपण तिचे सावत्रपण फक्त मिरालाच जाणवून द्यायची. सगळ्यां समोर ती मिराशी नेहमी चांगलीच वागायची. पण मीरा या सगळ्याकडे दुर्लक्ष करायची. निमूटपणे घरची कामे, अभ्यास, आणि बाबांशी अधूनमधून गप्पा मारणे.. हेच तिचे आयुष्य.

साप चावण्याचे निमित्त झाले आणि बाबा तिला सोडून गेले... तिचे आयुष्याचे सुकाणू तिच्या सावत्र आईच्या हाती देऊन … आणि तिची सख्खी आई तिला सोडून फार पूर्वीच देवाघरी गेली होती... तिला सौंदर्याचा शाप देऊन.... आता मीरा अगदी एकटी पडली. ती रीमा ला आपली समदुःखी मानत होती. पण असे नव्हते... रीमा ला

आईचा आधार होता. आणि आता आईला मिरामध्ये आपला आधार दिसू लागला. मामा म्हणायचा... ताई... ही उफाड्याची पोर.... जीवाला घोर... कशी संभळणार तू दोन्ही मुलींना... तुझ्याकडे असे कितीसे पैसे असणार... तुझ्या नवऱ्याची मिल मधली नोकरी ती कसली... आणि तुझे हे कायमचे मागे लागलेले संधिवाताचे दुखणे.... तू काम तरी काय करणार... पैसा लागतोच ना जगायला.... तेव्हा माझे ऐक... मीराला पाठव माझ्याबरोबर मुंबईला. तिला एखाद्या श्रीमंत घरात काम मिळवून देतो. बक्कळ पैसा देतात ही लोक घरकामाला... तुम्ही इकडे काय खाल असे ती तिकडे खाईल, ल्याईल... परत तुला दर महिन्याला पैसे पोचविण्याची जबाबदारी माझी.... सावत्र आई असली तरीही बाईच होती ती. तिने शंका बोलून दाखवली.... नक्की घरकामासाठी... की..... ??? मामा ने ग्वाही दिली असले पाप मी करणार नाही.... वचन देतो... बाकी त्या शहराचे पाणी तिला कसे लागेल... ते तिचे नशीब... आईला पटले. मग तिच्या चारित्र्याच्या हमीचे वचन घेऊन मिराची रवानगी मुंबई ला झाली. मामाने शब्द पाळला. तिला एका चांगल्या गर्भश्रीमंत घरात घरकाम मिळवून दिले. कुटुंब खुप मोठे होते. दिवसभर काम अगदी पडेल ते... उसंत अशी नाहीच. घरच्या बायकांना अगदी चोख काम लागत असे. मीरा रात्री किचन मध्ये संतरंजी टाकून झोपत असे... अगदी पडल्या पडल्या.... स्वप्न बघण्याचे पण त्राण उरायचे नाही तिच्यात. काम भरपूर होते. पण खायला मिळत होते. घरातल्यांचे जुने कपडे मिळत होते... आणि

एक वेगळे च श्रीमंतांचे जग तिला जवळून बघायला मिळत होते. दर महिन्याला मामा येऊन तिचा पगार घेऊन जायचा. निम्मा स्वतःसाठी ठेवायचा निम्मा तिच्या आईला पाठवायचा... तुला काय करायचे आहेत पैसे. असे म्हणून तिला मोठ्या मनाने पाच दहा रुपये खाऊ खायला म्हणून द्यायचा.... तिथे तिची शिवम् शी ओळख झाली. त्याच घरात तो ड्रायव्हर म्हणून होता. क्वचित कधी मधी त्याच्याशी मिराचे बोलणे व्हायचे. तो मीराला म्हणायचा... मी नाही आयुष्यभर ड्रायव्हर बनून राहणार... मी एकीकडे mpsc ची पण तैयारी करत आहे. बघ,.. एक ना एक दिवस मी पण खूप काही करून दाखवेन.... असलं आयुष्य नाही जगायचं मला... दुसऱ्यांच्या गाडीवर.... माझी स्वतःची गाडी असेल.. बघच तू..... तो मीराला पण म्हणायचा... तू पण शिक... बाहेरून परीक्षा दे... मी मदत करतो तुला... पण मीरा उदास हसायची. तिची ईच्छा च मरून गेली होती. तिचे गावातले घर, शाळा खुप आठवायचे तिला... पण हे सगळे फक्त स्वप्न आहे... आणि आत्ताचे आयुष्य च खरे आहे यावर तिचा का कोण जाणे विश्वास बसला होता... आता ती इकडे येऊनही चार वर्षे झाली होती. ती आता या जीवनाला सरावली होती.... अशातच एकदा मामा पैसे घ्यायला आला असताना त्याच्याकडून चुकून बोलले गेले... रिमाचे लग्न आहे पुढच्या महिन्यात.... मीरा ला आश्चर्याचा सुखद धक्का बसला... आणि अर्थातच वाईट ही वाटले.... तिचा विचार करणारे कोणीच नव्हते. तिने मामाकडे हट्टच धरला मला यायचे आहे लग्नाला... गेली चार वर्षे इथेच आहे मी... मला

गावाची खूप आठवण येते.... हे निम्मित पण आहे... मी सुट्टीचे बोलते ताईंशी.... तिने मामाना गळ घातली मला घेवून च चला... मामाचे हृदय ही हेलावले... तिने कशीबशी पंधरा दिवसांची सुट्टी जमवली. आणि एकदाची निघाली मामांबरोबर गावाला.... शिवम् तर तिला हळूच म्हणाला... आता परत येऊच नको इकडे.... काय आयुष्यभर धुणी भांडी करणार आहेस का.... बघ तिकडेच एखादा मुलगा आणि लग्न करून टाक.... मी जर परीक्षा पास झालो यावेळेस तर परत इकडे येणारही नाही... विचार कर स्वतःचा जरा.... मिराला खिन्न हसू आले... त्याचा निरोप घेऊन ती गावाला जाण्यासाठी निघाली....

गावाला घरी काही खूप चांगले स्वागत नाहीच झाले तिचे... कारण दोन वर्षांनी मोठी असलेल्या मीराला ठेवून रीमाचे कसे लग्न केले या प्रश्नाला तिच्या आईला तोंड द्यावे लागणार होते. पण शेवटी मीराच्या पैशांमुळे घर सावरले होते... त्यामुळे तोंड देखले का होईना आईने मीरा ला समजावले. रीमाचे लग्न होऊन जाऊ दे आपण तुझ्या लग्नाचे पण बघू शेवटी पैसा लागेलच ना लग्नाला.. रीमा काही तुझ्यासारखी कमावती नाही. तुलाच सांभाळून घ्यावे लागेल... मोठी ना तू... सगळं खोटं आहे हे समजून सुद्धा मीरा ने मान डोलावली.... अजून काय करू शकत होती ती.... दुपारी ती नदीकिनारी फिरायला गेली आणि तिथे स्वतःच्या एकटेपणाचा, दुःखाचा बांध फुटला.... शांत, सुन्न होऊन ती विचार करत होती... आता पुढे काय... आणि

तिच्या डोळयातून अविरत धारा वाहू लागल्या..... कितीतरी वेळ ती स्वतःच्याच तंद्रीत रडत होती....

अचानक तिच्या चेहऱ्या समोर कोणीतरी चुटक्या वाजवल्या. तिने बघितले तर शेजारीच एक मुलगा तिला रडताना बघून तिच्याकडे आला होता.

हे बघा... मी तुम्हाला विचारणार नाही... का रडताय... काय झाले. ?.. पण एवढे मात्र सांगू शकतो... की हे आयुष्य ना या समोरच्या नदीसारखे ठेवले पाहिजे.... वाहते.... म्हणजे असतेच तसे ते... सतत पुढे वाहत जाते.... पण आपणच त्यावर एकटे पणाचे, दुःखाचे, वैफल्याचे बंधारे बांधतो.... आणि मग साचत जाते आयुष्य... एकाच ठिकाणी अडकून राहते... तुम्ही मला जरा चांगल्या घरातल्या, थोडेफार शिकलेल्या वाटताहेत, नक्कीच तुम्हाला तुमच्या दुःखातून मार्ग मिळेल.... पण आधी रडणे थांबवा....

त्याचे बोलणे ऐकून तिला खूप बरे वाटले. स्वतःला सावरत तिने विचारले... कोण तुम्ही... या गावातले नसावेत बहुधा...

बरोबर आहे तुमचे.... मी इथे माझ्या मावशीकडे आलो आहे. पंधरा दिवसांनी मला मुंबईला एका कंपनीमध्ये जॉईन व्हायचे आहे त्या आधी मावशीला भेटायला म्हणून आलो आहे. जसा मी इकडे आलोय, तसा रोजच येतो नदीवर, तुम्हाला आजच पहिले, कोण तुम्ही ? तिने तिचे नाव सांगितले.

Ohhhh..... तुम्हीच का मीरा... माझ्या मावशीने मला सांगितले तुमच्याबद्दल. सगळया गावात सध्या तुमचीच चर्चा सुरू आहे. खरच तुम्ही खूप वाईट परिस्थितीतून जात आहात. पण विश्वास ठेवा देवावर सगळे नीट होईल परत.

मुंबईला कुठे नोकरी करतात तुम्ही.

तिने तिच्या कामाच्या घराचा पत्ता सांगितला.

संध्याकाळ होत आली होती. ती परत घरी जायला निघाली. त्याने डोळयांनीच तिला विचारले.... उद्यापण येशील ना नक्की इथे परत.........

मीरा तिथे असेपर्यंत रोज दोघे नदीकिनारी भेटायचे. खर तर अमोल ला ती खूप आवडली होती, तिचा साधेपणा, काळेभोर डोळे, लांबसडक केस... सगळेच... तिच्याशी बोलताना जाणवले की ती खूप सुस्वभावी आणि हुशार ही आहे... अमोल प्रेमात पडला मीरा च्या... रोज दोघे भेटायचे खूप गप्पा मारायचे... मीरा च्या जीवनात तर आनंदाचा झराच आला होता जणू.... अमोल च्या रूपाने..

जायच्या आदल्या दिवशी अमोल आणि मीरा दोघेही खूप कासावीस झाले. आणि अमोल ने सांगून टाकले... मीरा.... मला तू खूप आवडतेस.... मला तुझ्याशीच लग्न करायचे आहे.... मीरा ने ही लाजून सहमती दर्शवली.

मीरा मी मुंबईला तुला भेटायला येईल. त्याने त्याच्या कंपनीचा पत्ताही दिला तिला.

मीरा,.. मला जरा नोकरीत सेटल होऊ दे मग आपण लग्न करूयात... मी तेव्हाच माझ्या घरच्यांशी पण बोलेल. मीरा तिच्या आनंद अश्रु सकट त्याच्या बाहुपाशात विसावली... दोघांचे डोळे वाहत होते... नदी... सतत वाहणारी नदी होती साक्षीला..... खरच... कुठे वाहत जाणार होते... मीरा चे आयुष्य... या नदी सारखे.

.... की नदी जसे समुद्राला जाऊन मिळणार तसे तिचे मिलन होणार होते अमोलशी ???????

## भाग ३

### * कथेतील काळ मोबाइल पूर्व आहे. Landline ची नुकतीच सूरवात होत आहे *

एकदा गावातल्या घराकडे मीरा ने डोळे भरून पहिले. आईही थोड्या दिवसांनी रीमाकडे राहायला जाणार होती. आता मीराला कळून चुकले की मुंबई हेच तिचे गाव... या अफाट मायानगरीत ती अगदी एकटीच..... परत मुंबईला आल्यावर मात्र मीरा बदलली होती. आता ती स्वतःबद्दल विचार करायला लागली होती. अमोल च्या भेटीमुळे तिला परत एकदा जीवनाला सामोरे जायची ताकद मिळाली होती. तिने शिवमच्या मदतीने बाहेरून परीक्षेचा फॉर्म

भरला. जे काही थोडेफार पैसे होते त्यातून पुस्तके आणून घेतली. आता तिला जीवनाचा एक उद्येश्य मिळाला होता. खूप आनंदी असायची ती आजकाल. शिवमच्या हे लक्षात आले. त्याने आनंदाचे कारण विचारल्यावर तिने अमोलबद्दल सर्व काही सांगून टाकले. दुसरे होते कोण तिचे या मायानगरीत.... शिवमला ही आनंद झाला. एक आयुष्य सावरत होते..... अशीच दोन वर्षे निघून गेली. दर महिन्याला अमोल मीराला भेटायला यायचा. शिवम् आणि अमोल ची पण आता चांगली ओळख झाली होती. मीराला घरातले सामान आणण्याच्या निमित्ताने शिवम् तिला मार्केट ला गाडीतून घेऊन यायचा तिथे अमोल आणि मीरा भेटायचे. सुखी भविष्याची स्वप्ने बघायचे आणि परत वास्तवात परतायचेच नाही. आजकाल स्वप्न आणि फक्त स्वप्नं हेच मीरा चे जग होते, भरपूर काम, अभ्यास आणि जोडीला स्वप्ने.... कसे दोन वर्षे निघून गेली कळलेच नाही. आता तिचे ग्रॅज्युएशन चे शेवटचं वर्ष होते. अमोल मीराला म्हणाला आता सहा महिन्यांनी दिवाळी येत आहे. त्याच्या आधी मी आपल्या लग्नाचे घरी बोलतो. तू हे काम बंद कर आपण लवकरच लग्न करू. या दिवाळीच्या आधीच तू लक्ष्मी बनून ये, राणी... मीराला जणू पंखच फुटले..... सुखी संसाराची स्वप्ने बघण्यात ती रममाण झाली......... पण.... पण.... असे काहीच होणार नव्हते...... नियतीला हे मान्य नव्हते....

अगदी अनपेक्षित बातम्या मीरावर धाडधाड येऊन आदळल्या. पहिली छोटीशी बातमी म्हणजे... शिवम् mpsc परीक्षा पास झाला.

तो मालकांना पेढे घेऊन सांगायला आला आणि त्याच क्षणी त्याने नोकरी सोडली.

तो आता पूर्णवेळ इंटरव्ह्यू ची आणि पुढची तयारी करणार होता. त्याने जाताना अगदी आपुलकीने मीराला शुभेच्छा दिल्या. परीक्षा दे, पास हो, चांगले जीवन जग... आता लवकरच तुझे लग्न होईल. त्यासाठी पैसा साठव. मामाला पैसे देणे बंद कर आता. तू सज्ञान आहे आता. घाबरु नकोस. कोणी तुला त्रास नाही देऊ शकत. एवढे आपुलकीचे बोलणे ऐकून मीराला भरून आले. तिचा त्या बंगल्यातला एकमेव साथीदार, मित्र दूर जात होता...... अजून बरेच घडायचे होते मीरा च्या आयुष्यात.....

दुसऱ्या बातमीने मात्र मीरा खूप हवालदिल झाली. तिला परत संपूर्ण एकटी करणारी बातमी होती ती. अमोल ला त्याच्या कंपनीने प्रमोशन देऊन दिल्ली ला पाठवायचा निर्णय घेतला होता. अगदी दोन महिन्यात त्याला तिकडे जॉईन व्हायचे होते. त्याआधी तो दहा दिवस गावाला जाणार होता. मीराला रडू आवरेना... मी पण तुझ्या बरोबर दिल्लीला येणार...... नाही इकडे एकटी राहणार.... मीरा लहान मुलीसारखा हट्ट करू लागली.... अमोल ने तिला परोपरीने समजावले. हे बघ मी आता घरी जाईल तेव्हा घरी तुझ्याबद्दल बोलतो. आणि ठरल्याप्रमाणे मी दिवाळीच्या आधी येईल तुला गावाला घेऊन जाईल आणि लगेच आपण लग्न करून दिल्लीला परत जाऊ. समजून घे राणी... माझे आईवडील खूप जुन्या विचारांचे

आहेत. नाहीतर तुला आत्ताच गावाला नेले असते. आणि मी तुला रोज पत्र लिहीत जाईल. बस?... माझ्या कंपनीचा पत्ता, फोन नंबर तुला देऊन जातो. तू पण पत्र पाठवत जा मला रोज. फोन माझ्या कामाच्या जागेपासून किती लांब असेल माहीत नाही. पण पत्र मिळेल मला नक्की. मी वाट बघेल तुझ्या पत्रांची.... मीरा कशीबशी सावरली. अमोल घरी गेला. घरच्यांना मान्य नव्हतेच पण मुलाच्या सुखासाठी ते तय्यार झाले. ही आनंदाची बातमी सांगायला आणि मीराला दिल्लीला जाण्याआधी भेटायला अमोल जेव्हा आला. तेव्हा मीरा ला या आनंदाच्या बातमीने अमोलचा विरह सोसण्याचे बळ मिळाले.

अमोल निघून गेला आणि दहा बारा दिवसातच ती बातमी येऊन थडकली.... वर वर साधी वाटणारी पण मीरा च्या आयुष्याला कलाटणी देणारी.... आणि,... भविष्याची स्वप्ने रंगवीत होती मीरा.... की जी कधी पूर्ण होणार नव्हती.

---------------------------------------------------------------

त्यादिवशी पार्टीत मीरा पोचली. तिला mr डिसिल्वा ना जाऊन भेटायचे होते. नंतर mr डिसिल्वा सांगतील तसे...... ती जाऊन भेटली.

Welcome young lady... you are beautiful. आता थोड्याच वेळात mr बोस येतील. तुम्हाला त्यांना अटेंड करायचे आहे. कळलं?..... till then you are free.... eat, drink and

enjoy...... आज मीरावर mr बोस ना खुश करण्याची जबाबदारी होती हे तिला कळून चुकले होते. तिथे ती एका सोफ्यावर मसिके चाळत बसली. थोड्याच वेळात mr बोस आले. आणि ती त्यांच्याबरोबर रूम मध्ये गेली....... ही पार्टी यशस्वी होण्यामागे ती आहे याचा तिला अंदाज होता..... कुठल्यातरी प्रोजेक्ट ला mr बोस नी मान्यता देण्याचे गरजेचे होते. आणि mr बोस ना खुश करणे डिसिल्वा ना भाग होते... तशी स्पष्ट मागणी होती mr बोस यांची.... यासाठी मीरा इथे होती..... मीरा जेव्हा परत बाहेर आली तेव्हा पार्टी रंगात आली होती आजुन बराच वेळ चालणार होती. मीरा लगेच घरी जायला निघाली गाडी तयार असल्याचा निरोप तिला मिळाला. ती थकून गेली होती. आपल्याच तंद्रीत हॉटेलच्या पायऱ्या उतरत होती. एवढ्यात तिच्या समोर कोणीतरी हाताने चुटक्या वाजवल्या......... अगदी त्यादिवशी अमोलने वाजवल्या होत्या तश्याच................

आणि हो..... तो अमोलच होता..... तब्बल आठ वर्षांनी समोरासमोर आले होते ते दोघे.... अगदी अनपेक्षितपणे.... मीराला भोवळ आली. अमोलने तिला सावरलं. दोघेही एकमेकांना अनिमिष नेत्रांनी बघत होते. दोघांचेही डोळे झरू लागले... अश्रू थोपवणे दोघांनाही शक्य नव्हते. अमोलने मीरा चा हात हातात घेऊन जवळ ओढले....

कुठे होतीस तू मीरा ???? किती शोधले मी तुला.... का मला अशी सोडून गेलीस तू ???? मी मुंबईला आल्यावर तुला शोधायचा किती प्रयत्न केला.... तू जिथे काम करायची तिथे नवीन लोकं होते त्यांना तुझ्याबद्दल काहीच माहिती नव्हती. कुठे हरवली होती तू... आणि आता इथे कशी ???.... लग्न नाही ना केले तू.... मला माहित होते तू मला केव्हा न केव्हातरी भेटणार.. म्हणून मी ही अजून एकटाच आहे...

अमोलचे प्रश्न थांबत नव्हते आणि मिराचे अश्रू.... इतक्यात... अमोल चा कलिग आला.... विचित्र नजरेने त्याने अमोल ला विचारले.... अमोल तू इथे काय करतो आहेस... किती लेट केला पार्टीला यायला.... mr डिसिल्वा नी तुला खूप वेळा विचारले... चल लवकर......... आणि तो बाजूला जाऊन अमोलची वाट बघत राहिला....

मीरा मी आता जरा घाईत आहे.... मला उद्या घरी ये न भेटायला. मी वाट बघतो तुझी.... उद्या रविवारच आहे. खूप गप्पा मारू.... येशील ना नक्की...... आता दूर नको जाऊस परत..... त्याने पत्ता फोन नंबर दिला.... येशील ना राणी नक्की..... मला प्रॉमिस कर आत्ता.....

मीरा ने प्रॉमिस केले. त्याचा हात हातात घेऊन त्याच्या डोळ्यात बघितले.... अजूनही मीरासाठी पहिल्यासारखे च प्रेम दिसले तिला त्याच्या डोळ्यात..... ती म्हटली.... नक्की येते मी अमोल... अगदी नक्की..... आता नाही ताटातूट होणार आपली...... आणि जड

अंतःकरणाने अमोल आणि मीरा ने एकमेकांचे हात सोडले आणि आपापल्या दिशेला जायला निघाले.......

आजची रात्र.... मीरा च्या डोळ्याला डोळा लागणे शक्यच नव्हते...... ज्या आठवणींना ती विसरायचा प्रयत्न इतकी वर्षे करत होती.... त्या सगळ्या तिच्याभोवती फेर धरून नाचू लागल्या........ अमोल दिल्लीला गेल्यावर दहाच दिवसात ती जिथे काम करायची ते कुटुंब परदेशात राहायला जाणार असल्याचे तिला कळले.... पण तिला सांगितले गेले. की जे नवीन कुटुंब येणार आहे त्यांनाही घरकामाला बाई पाहिजेच आहे. त्यामुळे ती इथे राहू शकते. मीरा च्या जीवात जीव आला. कारण आता थोड्या दिवसांसाठी तिला नवीन काम शोधावे लागणार नव्हते. नवीन कुटुंब पण खूप मोठेच होते. पण आधीच्या कुटुंबा पेक्षा खडूस होते. माणुसकीचा पूर्णतः अभाव होता या कुटुंबात.... विशेष करून तिच्या मालकाचा मेव्हणा.... त्याची वाईट नजर जाणवली मीराला... मीरा दूर राहायची त्यांच्यापासून शक्यतो स्वयंपाकघर सोडून ती जायचीच नाही कुठे..... ते राहायला आल्यावर थोड्याच दिवसांनी त्यांनी एक खूप मोठी पार्टी ठेवली. जोरदार तयारी झाली, दारू, नॉनव्हेज सगळी रेलचेल होती.... मीरा कामाला जुंपली होती... शेवटी पार्टीची रात्र आली.... खूप लोक आली होती... मीरा किचन मध्ये एका कोपऱ्यात होती. बाहेर खूप मोठ्या आवाजात गाणी चालू होती... लोक हसत होते.... मीरा खूप थकली होती... तरी पार्टीत पाणी देणे खाण्याचे बोल परत भरणे यासाठी चकरा मारणे भाग होते तिला....

रिकामे बोल घेऊन भरलेले तिथे ठेवून ती किचन मध्ये आली..... आणि मागून कोणीतरी तिच्या तोंडावर हात दाबून धरला तिला उचलत मागच्या दाराने दुसऱ्या बेडरूम मध्ये नेले... ३ जणे होती ती.... मालकांचा मेव्हणा आणि त्याचे मित्र...... दारूचा भपकारा, आणि तिच्या शरीराची लचके तोडणारी भयानकता...... ती ने डोळे कसोशीने उघडे ठेवून जोरात ओरडण्याचा निकराचा पण निष्फळ प्रयत्न केला.... पण.... कोण ऐकणारे नव्हते तिचे.... पार्टीच्या आवाजात तिचा आवाज कोणालाच ऐकू जाणे शक्य नव्हते..... ती बेशुद्ध पडली........

थोड्यावेळाने मीरा शुद्धीवर आली...... सगळीकडे ठणकत होते... अतिरक्तस्राव झाल्याने ती ग्लानी मधेच होती.... पार्टी संपली होती. त्या घरच्यांनी तिची रवानगी एका छोट्या खोलीत केली. बाहेरून कुलूप घातले.... दोन चार दिवसांनी मीरा जरा उठून चालण्या सारखी झाली.... तिला पद्धतशीरपणे धमकी देऊन तिच्या असहाय परिस्थितीची कल्पना देण्यात आली.... पोलिसात गेली तर जिवानिशी मारण्याची धमकी ही होतीच त्यात....... असहाय मीरा अमोल ला पत्र पाठवायाच्या संधीचा शोध घेऊ लागली. घरच्या फोनवरून फोन करणे तिला शक्यच नव्हते..... आता ती परत थोडे थोडे घरकाम करू लागली.... किती दिवस तिचे लाड पुरवणार ???.... पण मीराला कळून चुकले होते.... इथे राहणे म्हणजे..... जीवाशी खेळ आहे...... परत कधीही, केव्हाही असे होऊ शकते..... आणि.... संधी साधून थोड्या दिवसांनी ती तिथून पळाली......

## भाग ४

अंतिम भाग.

मीरा वाट फुटेल तिकडे पळत सुटली... येताना तिने बरोबर फक्त एक छोटी कपड्याची बॅग आणि अमोलचा पत्ता फोन नंबर असलेला कागद बरोबर आणला होता. तिच्या समजा नुसार बऱ्याच लांब आली होती ती. त्या घरापासून... एसटीडी बूथ मध्ये जाऊन तिने नंबर फिरवला... पण तो लागतच नव्हता. तिने परत परत प्रयत्न केले... पण नंबर लागला नाहीच... कारण आमोलचे ऑफिस रिलोकेट होत होते... नवीन अड्रेस वर शिफ्ट होताना फोन नंबर ही बदलणार होता. म्हणजे आता मीराकडे अमोलचा पत्ता आणि फोन नंबर ही नव्हता.... हा बदल कळवण्यासाठी अमोलने वारंवार फोन करूनही घरातल्या लोकांनी मीराला निरोप न मिळू देण्याची खबरदारी घेतली होती.....

आणि आता त्या घरातले लोक मीरा चा शोध घेत होते जरी ती असहाय होती, तरी ती पोलिसात जाण्याची शक्यता होतीच. घरातल्यांना कोणतीही गडबड नको होती. मालकाच्या मेव्हण्याने आणि त्याच्या मित्रांनी लगेचच कसून शोध सुरू केला.... तशी पण मीरा खूप काही दूर गेली नव्हतीच.... दुर्देवाने थोड्याच प्रयत्नानंतर सापडली त्यांना..... तिला घेऊन ते एका बाईकडे आले... काहीतरी त्यांचे बोलणे झाले. आणि त्या बाईने.... रोझी ने...... तिच्याकडे ठेवून घेतले.... थोडक्यात.... तिला विकत घेतले........

रोझी जरी धंदेवाईक होती तरी संवेदनशील होती... तिने मीरावर कडक नजर ठेवली पण त्रास दिला नाही. तिला सावरायला वेळ दिला..... पण मीरा मध्ये रोझी आता तिच्या म्हातारपणी ची काठी शोधत होती.... काय करणार तिचाही नाईलाज होता.... मीरा ने खूप गयावया करून तिचे गाऱ्हाणे मांडले.... रोझी ला हे सगळे नवीन नव्हते... अश्या कितीतरी मीरा तिच्या आसपास तिने बघितल्या होत्या... पण तरीही... सगळे ऐकून तिला अमोलला फोन आणि पत्र लिहायची परवानगी दिली....

...

पण अमोल ला निरोप मिळणे शक्य नव्हते.....

... अमोल ला ही कळेना.... मीरा ला नवीन पत्ता फोन नंबर मिळाला आहे की नाही....

रोझी ने तिला जळजळीत वास्तवाची जाणीव करून दिली... तिला तिच्या आई, रीमा, आणि मामांचा आधार मिळणे शक्य नव्हते..... रोझी खरच खूप समजूतदार निघाली.... जो काही मामा चा पत्ता मीराला आठवत होता तिथे संपर्क साधून तिने मामा ला बोलवून घेतले..... कारण...... रोझीला पक्के माहीत होते आता मीराला तिच्याजवळ राहण्याशिवाय दुसरा पर्याय नाही... तिचा स्वार्थी मामा आणि आई.... काही करणारच नाही मीरासाठी....... हे रोझी ने चांगलेच हेरले होते... मीराला आता कोणीच स्वीकारणार नाही..... तरी पण एक प्रयत्न म्हणून मामाला हे सगळे सांगितले.... त्यावर

त्याने सरळ हात वर केले... आणि रीमाच्या सासरी काय सांगणार ??? त्यामुळे आईने पण असमर्थता दर्शविली. आणि बोलणेच बंद केले..... रोझी ने पैसे मोजले होते मीरासाठी... कडक पहारा बसवला मीरावर..... आता ती मीराला तिथून सोडणार नव्हती....... आणि मिराचे हे नवीन आयुष्य सुरु झाले.... उच्चभ्रू

लोकांना खुश करणे हे आता तिचे काम होते. रोझीने यातून खूप पैसे कमावले.

रोझी ची ही अशीच काहीशी कहाणी होती. तिला काहीतरी चांगले ही करायची इच्छा होती. तिच्या खूप लोकांशी ओळखीही होत्या. तिने एक एनजीओ सुरू केला होता. आता मीरा पैसे कमवत होती आणि एनजीओ च्या कामात रोझी ला मदतही करत होती.

तिने हे जळजळीत वास्तव फक्त एकच आशेवर स्वीकारले होते..... अमोल कधीतरी भेटेल... आणि तिची यातून सुटका होईल... पण सध्यातरी तिचे जग तिचे काम आणि एनजीओ हेच होते. तिचे राहणीमान झपाट्याने बदलत गेले. भरपूर पैसा मागे पडत गेला. तसे मामाकडून, रीमा कडून परत फोन सुरू झाले... आणि अचानकच हार्ट अटॅक येऊन रोझी चे नुकतेच निधन झाले. NGO ची जबाबदारी मीरा वर येऊन पडली.... आणि मीरा एकटी पडली. शांताबाई, आणि एनजीओ तले काका यांनी तिला सावरले....

...........................................................................................

आणि हे सर्व नुकतेच घडले असताना...... अचानक त्या रात्री अमोल आला मीरासमोर..... मीरा रात्र भर तळमळत होती... उद्या ती अमोल ला भेटायला जाणार होती... सगळं घडलेले सांगणार होती..... अमोल स्वीकारेल का मला.... ?.. हा प्रश्न तिला छळत होता.... पण काल पण तिने अमोल च्या डोळ्यात तिच्याबद्दल असलेले प्रेम वाचले होते. आणि तो अजूनही तिच्यासाठी च थांबला होता. त्यामूळे मीराला थोडा आशेचा किरण मिळाला...

एकदाची सकाळ झाली... मीरा धीर गोळा करत अमोलकडे येऊन पोचली....

काल रात्री जो कलीग अमोल ला बोलवायला आला होता, त्याच्याकडून अमोल ला मीरा इथे का आली होती ते कळले होते. प्रचंड चिडला होता तो.... रात्र भरात त्याने तिला न स्वीकारण्याचा निर्णय घेतला ही होता....

मीरा समोर आल्यावर अमोल चा पारा चढला पण त्याने ते दाखवले नाही. शांत शांत अमोल ला बघून मीरा ला अमोलच्या मनाचा ठाव लागेना.... तिने च बोलायला सुरू केले.....

अमोल..... मला तुला सगळे सांगायचे आहेच.... प्लिज.. माझे ऐकून घे..... तुला कालच्या पार्टी तले सत्य समजले च असेल तुझ्या मित्राकडून.... पण तू प्लिज माझे ऐकून घे.... ती हे बोलत असतानाच कोणाचातरी अमोलला फोन आला....

.... तो फोनवर बोलत होता.... हो... आहे ना मी घरी.... ये तू काही हरकत नाही.... ठीक आहे.. मी वाट बघतो.. ये... आणि त्याने फोन ठेवला..

हा फोन शिवम् चा होता.... मुंबईला आल्यावर अमोल आणि शिवम् एकमेकांना भेटले होते आणि संपर्कात होते..... पण तसे आत्ता अमोल ने मीराला काहीच सांगितले नाही.... त्याला लवकरात लवकर मीराला इथून रवाना करायचे होते...

अमोल फोन वर बोलत होता तोपर्यंत मीरा ने पुढ्यातल्या ग्लास मधील पाणी घटा घटा पिऊन संपवले... कुठून सुरू करावे मीराला कळेना... अमोल चा कमालीचा परकेपणा तिला काही सुचुच देत नव्हता..... काल तिला भेटलेला अमोल आणि आजचा अमोल..... पुर्णतः वेगळा होता.... एका रात्रीत बदलाला होता....... तरी तिने बोलायला सुरू केले...

थोड्यावेळाने अमोल ने तिला हात वर करून बोलणे थांबावायला सांगितले...... आणि चिडून म्हणाला..... काही ही असेल तरी मला आता तुला स्वीकारणे शक्य नाही.... तू तुझ्या वाटेने आणि मी माझ्या.... परत माझ्यासमोर येऊ ही नकोस.... सगळं संपलं आहे...

पण.. पण अमोल... तू आत्तापर्यंत माझ्यासाठी थांबला होतास... मला माहित आहे... तुझे प्रेम आहे माझ्यावर... प्लिज असं नको करुस... मी फक्त तुझ्या आशेवर जगत आहे.....

ते आता शक्य नाही... उगीच काहीतरी अपेक्षा करू नकोस आता माझ्याकडून.... मी तुला स्वीकारू शकतच नाही आता.....

पण... पण का... अमोल... जे काही झाले त्यात माझा काय दोष ????

मीरा... मला माझ्या आईवडिलांचा विचार नको का करायला.... या समाजात काय तोंड दाखवणार मी... कालच तो मित्र माझ्याकडे कसा बघत होता बघितले ना......

आणि.... आणि... सगळ्यात महत्वाचे म्हणजे आता तू virjin नाही राहिली... तू तुझे कौमार्य गमावले आहेस...... मी एका कौमार्य गमावलेल्या मुलीशी लग्न करणे शक्य नाही..... कधीच नाही.... एवढ्या वर्षांमध्ये.... माहीत नाही किती जणांनी.......

हे शब्द मीरा च्या कानात भाल्या सारखे शिरले आणि तिचे हृदय चिरत गेले..... आणि ती संतापाने लाल झाली.... आत्तापर्यंत... ज्या आधाराची ती वाट पाहत होती... की जो तिला समजून घेईल... असे तिला वाटत होते... त्याने न समजून घेताच तिला... फक्त तिला च दोषी ठरवले होते.... तिचा संयम सुटला....

अमोल.... खर आहे.... मी माझे कौमार्य गमावले आहे... पण तू ला फक्त तेवढेच दिसते आहे.... त्यामागची अगतिकता नाही दिसत माझी.... रोज तिळा तिळा ने मरत होते मी.... दगड झाला होता

माझा.... काय सहन केले याची तुला कल्पनाही नाही.... तरी तू माझ्यावर काहीतरी शिक्का मारून मोकळा झाला..... का अमोल...

. ??

स्त्री फक्त शरीराने च ओळखली जाते का....... तिचे शरीर तिचे चारित्र्य ठरवते का ?... स्त्रीच्या शरीराच्या एका भागाचे कौमार्य तिचे आयुष्य ठरवते का ??....... समाजातील एक घटक तिच्यावर अत्याचार करून तिला असे वागायला भाग पाडतो... आणि दुसरा घटक तिला यामुळेच वाळीत टाकतो....... हे कुठले नियम.... यात ती एक खेळणे फक्त???...... आणि हो...... कौमार्य फक्त... शरीराचे च असते का रे..... ????...

मनाचे काय???.... माझे शरीर म्हणजे मी आहे का.... नक्कीच नाही..... माझे मन तर virjin च आहे अजूनही...... पुर्णतः.... फक्त आणि फक्त तुझाच विचार, तुझीच स्वप्ने बघितली आहेत या मनाने.... म्हणजे मी....

.. हे कसे विसरतो तू.... तश्या अर्थाने तर... मी अजूनही कुमारिका च आहे.... माझे कौमार्य शाबूत आहे.... मी हे मान्य करणारच नाही.... की.... मी virgin नाही.......... मी

कौमार्य गमावलेले नाहीच......

मीरा च्या डोळ्यातून अश्रू वाहत होते..... कापलेल्या पतांगासारखी ती खाली पडू लागली..... तोच मागून शिवम् ने तिला सावरले आणि

सोफ्यावर बसवले... पाणी दिले... हे सगळं चालू असताना शिवम् केव्हाच दरवाज्यात येऊन उभा राहिला होता...

शिवम् ने अमोल ला समजवायचा प्रयत्न केला.... पण अमोल ने त्याचे म्हणणे धुडकावून लावले....

शिवम् आणि आमोलची वादावादी सुरू झाली.... मीरा तर पूर्ण तुटली होतीच.... तिला हे वाद सहन होईनात.... अमोल परत परत तिच्यावर तेच आरोप लावत होता.. आणि शिवम ला स्वतःचे म्हणणे पटवून देत होता... ते शब्द मीरा ला घायाळ करत होते.... वाद शिगेला पोचला......... शेवटी..... अमोल शिवम् ल म्हणाला..... तू काय केले असतेस माझ्या जागी ???केले असतेस लग्न तिच्याशी ??

शिवम् म्हणाला.... हो.... केले असते मी लग्न.... नुसता बोलत नाही आहे मी... करूनही दाखवू शकतो... मीरा मलाही आवडायची पहिल्यापासून... पण तिने तुझ्याबद्दल सांगितले आणि मी स्वतःहून बाजूला झालो...

आत्ताही जर ती मला स्वीकारायला तयार असेल तर मी तिच्याशी लग्न करायला तयार आहे..... पण तिला तिच्या कौमार्य चा बळी द्यावा लागेल... कारण अजूनही तिच्या मनात तूच आहेस.... आणि मी तिला त्यामुळे virgin च मानतो....

मीरा.... मी हे नुसते बोलायचे म्हणून बोलत नाही आहे.... मनापासून तू जर मला स्वीकारणार असलीस तर मी ही तय्यार आहे....

मीरा तिथून उठून जायला निघाली.....

अमोल काही न बोलता खिडकीतून बाहेर बघत होता.... खिडकीच्या चौकटीतून त्याला बाहेरच्या निवडुंगाचे फुले दिसत होते... फक्त फुले... कारण काटे असलेलं निवडुंग खिडकीच्या चौकटी मुळे दिसत नव्हते.... तो त्याकडेच बघत राहिला.... मीरा जाण्याची वाट बघत.....

मीरा ने एकदा अमोल कडे बघितले.... आता अमोल तिला खूप परका वाटत होता.... दुःखाने आणि अमोल बद्दल च्या तिरस्काराने तिचे मन आता भरले होते....

तिने एकदा शिवम् कडे बघितले... तिला त्याने समजून घेतले आणि त्याच्या मनातले सांगितले... याबद्दल तिला वाटणाऱ्या भावना तिला फक्त डोळ्यातून व्यक्त करता आल्या.... त्याबद्दलचे सगळे शब्द ती स्वतः बरोबरच घेऊन तिथून जाऊ लागली....

आणि तरीही... शिवम् तिच्या मागोमाग जात म्हणाला थांब मीरा..... मलाही तुझ्याबरोबर येऊ दे....

मीरा थांबली...

...... मागे वळून न बघता.... शिवम् आणि मीरा चालायला लागले....

समाप्त....

© स्वप्ना.

# दिवाळी चित्राच्या घरची..

पार्ट १

चित्राच्या लग्नाला आता एक वर्ष होऊन गेले होते. ती आता तिच्या सासरी चांगली रुळली पण होती. नुकतीच आंघोळ करून बाहेर येताना रोहितची आणि तिची नजरानजर झाली. रोहितने तिला नजरेनेच खुणावले, त्याचा अर्थ असा होता... शांततेत घे सगळ... जास्ती हट्टीपणा करू नकोस. तिनेही नजरेने त्याला ओके सांगितले आणि कामाला लागली.

चित्राचे मागच्या वर्षी रोहितशी लग्न झाले आणि तिने या भरल्या घराचा उंबरठा ओलांडला, मोठी जाऊ, दीर, त्यांचा छोटा गोडूला सौमित्र, सासू सासरे आणि ती दोघं... अगदी सुखी, पापभिरू, साधे भोळे, माणसं... पण जरा कर्मकांडांचा जास्तीच पगडा होता त्यांच्यावर..... आपण देवाचं केलं तरच फक्त देव आपलं चांगले करेल, नाहीतर काही खरे नाही... अशी त्यांची धारणा...

चित्राचे मत मात्र वेगळे होते. देवच आपल्याला बुद्धी देतो, सद्बुद्धी देतो आणि त्यानुसार आपण नैतिकतेने वागलो, कोणाला मुद्दामून दुखावले नाही तर घाबरण्यासारखे काय त्यात ? अनादी अनंत आहे तो, कर्ता करविता आहे तोच, त्याला अश्या कर्मकांडांची काय गरज

असे तिचे म्हणणे.... तिने कितीतरी वेळा रोहितला बोलून दाखवले होते...

तर विषय असा आहे की दिवाळी १५ दिवसांवर आली तरी घरात कुठे दिवाळीचा उत्साह नाही. चित्रा सोडून सगळयांना याची सवय झाली होती किंवा तसे ते दाखवत होते.... चित्राला तिची या घरातली पहिली दिवाळी आठवली.... एकदम भकास... खरं तर लग्नानंतरची पहिलीच दिवाळी. पण रेगेंकडे दिवाळी सण लाहेणा नाही, म्हणजेच साजरा करत नाहीत. अशी प्रथा..... त्यामुळे दिवाळी आली आणि गेली असेच झाले.... नाही म्हणायला चित्राच्या माहेरी सगळयांनाच पाडव्याच्या दिवशी जेवायला बोलवून यथासांग आहेर झाले. तो दिवस छान गेला. बाकीचे दिवस अगदीच साधारण गेले. तिला मागच्या वर्षी ची ती दिवाळी आठवून कासनुस झालं. नाही आकाशकंदील, नाही फटाके, फराळ, नवीन कपडे, अगदी अभ्यंगस्नान, ओवळणे पण नाही....

कालच रात्री तिने रोहीतशी वाद घातला, रोहित म्हणाला मला आणि दादाला पण लहानपणी वाटायचे... सगळीकडे उत्साह ओसंडून वाहत असतो पण आपल्याकडे मात्र काहीच नाही... पण नंतर आई बाबांच्या धाकाने सवय झाली...

तूच आता याबाबत आईशी बोल... तशीपण तू आईची लाडकी आहेस... आजकाल तर आई आम्हा मुलांपेक्षा तुम्हा सूनांचच जास्ती ऐकते.... रोहितने छद्मी हास्य करत सरळ हात वर केले...

रोहितचे म्हणणे खरे होते... सासू सूनांचे छान च गुळपीठ जमले होते... आता घरातल्यांना न दुखवता कसा मार्ग काढायचा यातून या विचारातच तिला झोप लागली.... सकाळी चित्राने सगळेजण नास्त्याला एकत्र आल्यावर पोह्यांची डिश सासूबाईंना देत हा विषय छेडला

आई, एक विचारू ? आपल्याकडे दिवाळी का नाही करत हो? सासूबाईनी अगदी सहज सांगितले. अग... आपल्याकडे लाहेणी नाही दिवाळी, रेगे घराण्याने दिवाळी साजरी करायची नाही अशी पूर्वापार प्रथा च आहे. आपणही त्यामुळे दिवाळी साजरी करत नाही फराळ, फटाके, अभ्यंग, ओवळने पण चालत नाही आपल्याकडे.... लक्षात ठेव हो... नाहीतर जाशील नवऱ्याला ओवाळयला, बाकी नवीन खरेदी तर आपण वर्षभर करत असतोच की...

पण काही कारण आहे का नाही करण्यामागे ?? काही शास्त्र आहे का यामागे ?? तुम्हाला तुमच्या सासूबाईंनी काहीतरी सांगितलच असेल की.... यावर निर्मळ हसत त्या म्हणाल्या.. अग मी पण एकदा असच अगदी माझ्या सासूबाईना विचारले होते. त्या म्हणाल्या मलापण नाही माहिती... मला माझ्या सासूने सांगितले म्हणून मी केले... त्यांना त्यांच्या सासूने सांगितले म्हणून त्यांनी केले... असेच पूर्वापार चालत आले आहे... कारण कोणालाच माहित नाही... कदाचित काहीतरी कुठल्यातरी पिढीत वाईट झाले असेल दिवाळीत... कशाला आपण तरी विषाची परीक्षा घ्या... पण आपण

दिवाळी साजरी करू नये अशी एकंदरीत देवाचीच इच्छा असावी... आपण ही प्रथा काटेकोर पणे पाळत आलो आहे... उगाच नसती भानगड नको... देवाला दुखावून कसे चालेल ??

त्यांचे म्हणणे खरे तर चित्राला मुळीच पटले नव्हते. पण आपल्या भोळ्याभाबड्या सासूला दुखावणे ही तिला नकोसे वाटले....

ह्म्म... म्हणत तिने चहाचा कप त्यांच्या हातात दिला...

पण तिच्या डोक्यात विचारांनी आणि प्रश्नांनी आता पिंगा घातला होता......

पार्ट २

दुपारी जावेच्या खोलीत ती गप्पा मारायला गेली आणि बोलता बोलता दिवाळीचा विषय काढला. तिची जाऊ मेधा ही म्हणाली, हो ना ! सुरुवातीला मला ही फार जड गेलं हे सगळं सौमित्र झाल्यावरही काही च फरक पडला नाही यात. गेली ७-८ वर्षे मी ही दिवाळी खूपच मिस करते. आणि या वर्षी तर सौमित्र ही काल परवा पासून विचारतो आहे. आई, दिवाळीचे फटाके कधी आणणार माझ्यासाठी ? शेजारचां कुणाल आणेल तेव्हा आपण पण आणायचे का ???इतके दिवस त्याला एवढं काही कळत नव्हतं पण आता त्यालाही दिवाळीचं कुतूहल वाटते.

चित्रा म्हणाली, तुला वाटत ना, सौमित्र ला फटाके आणि नवीन दिवाळीचा ड्रेस मिळावा मग त्यासाठी काहीतरी डोकं लढ्वल

पाहिजे... मेधा म्हणाली हो ना मला खरच असं वाटतं की सौमित्र ने दिवाळीत आनंदात असावे फराळाचं तर त्याला खूपच आवडते, ते सगळं आपण स्वतः त्याला करून घालावं, माझ माहेर ही खूपच लांब आहे ग आणि प्रत्येक वेळी शक्य नाही होत माहेरी जायला.... प्रत्येकाचे आपले व्याप असतात च की....

चित्रा म्हणाली... don't worry... आपण काहीतरी करु. तू मला साथ दे म्हणजे झालं... आता घरच्यांना न दुखवता यावर उपाय काय करावा याची खलबत करण्यात मेधाच्या रूम मध्ये त्यांचा बराच वेळ जाऊ लागला..

आणि २ च दिवसात त्यांच्या घरी एक माणूस भली मोठ्ठी सुटकेस घेऊन आला... मुझे रोहित सेठ ने भेजा है, खास बनारस का माल है आपको जो पसंद आये वो आप राख लो पैसे की चिंता मत करो... मै बाद में कभी भी रोहित सेठ से ले लुंगा.....

बनारसी साड्या म्हणजे सासूबाई चां विक पॉइंट... तरी पाहिले त्या नाहीच म्हणाल्या... पण तो माणूस खणपटीला च बसला.. रोहित सेठ को फोन लगाव... उन्होंने बोला तो ही मे जाऊंगा... शेवटी सासुबाई नी फोन केला.. तो म्हणाला, अग आई आमच्या ऑफिस मध्ये सगळयांनी घेतल्या म्हणून मीच त्याला घरी पाठवलं घे ठेवून तुम्हालाही २-४ त्यातल्या.. एवढे बोलून त्याने फोन ठेवला देखील.. इकडे तोपर्यंत त्या माणसाने सुंदर सुंदर ओरिजनल बनारसी सिल्क पसरवल्या सुद्धा.... त्यांचे मनोहारी रंग, पोत पाहून सासूबाईंना मोह

आवरेना, त्या मेधा ला म्हणाल्या.. अग, खरं तर दिवाळी तोंडावर आली आहे आणि आपण तर दिवाळी ला नवीन कपडे घेत नाहीत... पण मग असं करूयात का... आता कोजागिरी पौर्णिमा आहे चार दिवसांवर... तेव्हा नवीन कपड्यांच्या घड्या मोडूयात... नंतर वाटलं तर घालू परत दिवाळीला... कसं? मेधा हसू आवरत म्हणाली, हो ना आई कोजागिरी ला सगळेच नवीन कपडे घालू म्हणजे दिवाळीला घडी मोडली असे होणार नाही.... मग मनसोक्त तलम सिल्क ची खरेदी झाली. संध्याकाळी चित्राचा दीर म्हणाला आई हे काही बरोबर नाही.. आम्हीही नवीन कपडे घेणार आता... मग काय सगळेच कोजागिरी पौर्णिमेला नवीन कपडे घालून सोसायटीच्या कार्यक्रमाला दांडिया खेळायला गेले....

दुसऱ्याच दिवशी सौमित्र च्या शाळेतून मेसेज आला, मेसेज सोबत भलं मोठं पणंत्यांच पाकीट पण.. आणि सौमित्र साठी २०००₹ चे कूपन आणि व्हाउचर... पठ्ठ याने intercity drawing competition मध्ये पहिला नंबर मिळवला होता...

नातवाचे कौतुक करताना आजी थकत नव्हतीच. आजी ने कौतुकाने सौमित्र ची दृष्ट काढली आणि विचारले, काय बक्षीस देऊ तुला ?

सौमित्र ला बरोबर माहिती होते.. काय मागायचे ते... मुलांना सांगावं लागत नाही, काय चाललंय घरात ते...

त्याने स्वतःचा प्रॉब्लेम स्वतःच सोडवायचा ठरवले. पाहिले आजीकडून वचन घेण्याची खबरदारी घेत तो म्हणाला.. बघ हां

आजी.... नंतर नाही म्हणायचे नाही... नाही रे शोन्या... तू जे म्हणशील ते घेऊन देईल हां.... आजीने शब्द दिलाच... आणि तो झेलत नातवाने फटाक्यांची लिस्ट च ऐकवली... आजीला नातवाचे मन मोडवेना.

आता आपल्याला तर माहितीच आहे की दोन दिवसांनी परत काहीतरी भन्नाट होणार आहे..

तर यावेळेस गोगटे काकू मदतीला धावून आल्या. आल्या त्याच कावलेल्या आणि तोंड वाकडं करत... गोगटे काकू म्हणजे सासूबाईंच्या अगदी जिवलग, अगदी खासच.

काय झालं हो काकू ? चित्राने विचारले

अग, माझ्या सुनेचा हात मोडला ग... चांगल एक महिना प्लास्टर आहे आता.

मग.. काळजी घ्यावी लागेल आता...

अग काळजी कुठे जातीय पळून.. ती तर घेऊच ग.. पण दिवाळीच्या फराळाचं काय ???ते कोण करणार ?मी आता सूनेकडे बघू, घराकडे बघू की फराळाचं करू??

म्हणूनच हक्काने आले हो तुमच्याकडे... आश्या वेळेस तुम्ही मदत करणार नाही तर कोण करणार??

चित्रा आणि मेधा एकमेकींकडे बघून हसू दाबत होत्या..

अहो गोगते बाई... पण तुम्हाला तर माहितच आहे की आम्ही दिवाळीला फराळाचं करत नाही ते... मध्ये अधे च करून खातो झालं... तुम्हाला तर माहितच आहे की... इती सासुबाई...

हो, हो... माहित आहे.. म्हणूनच आले धावत पळत आत्ता.. दिवाळीला अजुन ८ दिवस आहेत.. आणि तुमच्या मेधाच चाललाय ना काहीतरी फूड बिझनेस करायचं... मग माझीच ही फराळाची पहिली ऑर्डर समजा... आणि दिवाळीच्या २ दिवस आधी द्या.

मेधा सासुबईंकडे बघू लागली..

आता यावर सासुबाई चांगल्याच विचारात पडल्या. पण काही क्षणातच म्हणाल्या

असं कर मेधा, गोगटे काकू साठी फराळाचं करशील तेव्हा जरा जास्तीच कर... आपल ठीक आहे पण सौमित्र ला ही बेसन लाडू, चकली खूप आवडते... नाहीतरी आपण दिवाळीच्या आधीच करून देणार यांना... आपल्यालाही ठेवू थोडे थोडे.... आत्ता कसं... म्हणत गोगटे काकूंनी आल्याच्या चहाचा कप हातात घेतला आणि चित्राला डोळा मारला...

आणि वासुबरसेच्या संध्याकाळी चित्राचे सासरे सौमित्र ला वसुबारस ची माहिती सांगत होते....

. तेव्हाच सदाशिव अचानक घरात आला...... त्याला बघून त्यांच्या कपाळाची शीर तडतड्लयाला लागली... त्यांना वाटले आपल्या छातीतून आता सूक्ष्म कळ येते आहे...

सासूबाईंच्या पोटात गोळा आला... छातीत धडधड व्हायला लागले... आणि आता काहीतरी अशुभ होणार... असे वाटून त्या सदाशिव कडे बघतच राहिल्या... मेधा आणि चित्राचे चेहरे अगदी पारच पडले... रोहित आणि चित्राचा दीर आजुन ऑफिस मधून यायचे होते....

सगळ्यांच्या चेहऱ्यावर.... एक उदास, नकोसे प्रश्नचिन्ह होते....

पुढच्या भागात बघू... काय झालं चित्राच्या घराच्या दिवाळीचं...

## Part ३

## अंतिम भाग

सदाशिव चित्राच्या सासऱ्यांबरोबर एकाच कंपनीत नोकरीला होता. दोघे खर म्हणजे मित्रच बऱ्याचदा एकमेकांकडे जाणे येणे.. अगदी घरोब्याचे संबंध... पण कुठल्याशा अमिषाला बळी पडून सदाशिव ने ऑफिस मधे पैशांची आफरातफर केली आणि पद्धतशीर पणे चित्राच्या सासऱ्याना यात अडकवले. कोर्टात केस उभी राहिली... पण ऑफिस मधील बाकीच्या सहकाऱ्यांच्या साक्षीने ते यातून निर्दोष सुटले.. उलट सदाशिव ला बडतर्फ करण्यात आले... त्याने

पुढे स्वतःचा छोटासा व्यवसाय सुरू केला.. पण त्याच्या बायकोने चित्राच्या सासऱ्याना दोषी ठरवून त्यांचा अपमान केला... त्यांच्यविरुध्द अफवाा पसरवण्याचा प्रयत्न केला... अर्थातच चित्राच्या सासरे एक सज्जन गृहस्थ असल्याने याचा त्यांच्या सामाजिक जीवनावर परिणाम झाला नाही... पण या सगळ्याचा ताण येऊन त्यांना हृदयविकाराचा झटका आला... त्यातून सावरल्यानंतर त्यांनी सरळ voluntary retirement घेतली.. आणि गप्प गप्प राहू लागले... मग दोन्ही मुलांनीच घराला सावरले...

आणि आता...

सदाशिव ला असे अचानक समोर पाहून चित्राच्या सासऱ्याना आणि बाकी घरातल्यांना धक्का तर बसलाच पण त्यांना आता काय करायचे ते ही सुचेना...

हा इथे कशाला आला हाच विचार प्रत्येक जण करत असतानाच.... सदाशिव चित्राच्या सासऱ्यां च्या पायावर पडला... आणि डोळ्यात पाणी आणून म्हणाला... तुम्ही मला मोठ्या भावासारखे असून पण मी तुमच्याशी असे वागलो.. तुमची बदनामी करण्याचा प्रयत्न केला... पण काही काळानंतर मला माझी चूक कळून आली... ज्यांनी मला आमिष दाखविले होते.. ते सगळे यातून नामानिराळे राहिले... मीच पापाचा धनी झालो... पण मला आता तुमची क्षमा मागून प्रायश्ित्त करण्याची संधी द्या... आम्हाला माफ करा.. असे

म्हणत दोघे नवरा बायको त्यांच्या पाया पडू लागले... चित्राच्या सासऱ्यांच्या चेहऱ्यावर खूप वर्षांनी आनंद आणि समाधान पसरले होते... झालं गेलं गंगेला मिळालं... असे म्हणत त्यांनी सदाशिव ला उठवले. सासूबाईंना आनंदाने शब्दच सुचेना... शेवटी त्या म्हणाल्या.. चित्रे, अग मेधाने केलेल्या लाडवानी सगळयांची तोंड गोड कर बरं... देवाने शेवटी न्याय केलाच... जे झाले ते झाले... आता मात्र सदाशिव भाऊजी तुम्ही आजपासून आमच्या घरातलेच सदस्य बर... डोळे पुसत असलेल्या सदाशिव च्या बायकोला चित्राच्या सासूबाईनी जवळ घेतले.

एवढ्यात सौमित्र चे बाबा घरात येत म्हणाले... अग लाडू राहू दे.. हे पेढे घ्या सगळयांनी माझ्या प्रमोशनचे दिवाळी नंतर मी झोनल मॅनेजर म्हणून काम करणार...

व्वा व्वा म्हणत सगळे पेढे तोंडत टाकणार एवढ्यात चित्रा म्हणाली थांबा... मला पण काहीतरी सांगायचे आहे... अग मग बोलंना... नव्याने सदस्य झालेल्या सदाशिव भाऊजी नी म्हटले... पण चित्रा मेधाचा हात धरून तिला आत मध्ये घेऊन गेली....

दोनच मिनिटात मेधा हसत हसत बाहेर येत म्हणाली, पेढे आजूनच गोड लागणार आता... आम्ही काका, काकू सौमित्र मोठा दादा आणि तुम्ही आजी आजोबा होणार आता...

सगळ्यांनाच झालेल्या आनंदाचा सामना करायला नेमकी रोहितने तेव्हाच entry घेतली. आणि मग पेढ्यानी त्याचे तोंड गोड करण्याची सगळ्यांनाच घाई झाली...

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सगळे एकत्र असताना सासुबाई म्हणाल्या.. या दिवाळीत घर आनंदाने भरून गेलं आहे...

माझ्या नजरेनं आत्तापर्यंतच्या सगळ्या दिवाळीत मी तुम्हा सगळ्यांना ओवळीत होतेच... पण आता यावर्षी पासून निरांजनाने पण ओवाळी न म्हणते....

काय मेल देवाने तरी सगळच चांगलंच केले आहे हो आत्तापर्यंत.... इथून पुढेही सगळं चांगलंच होईल... उगीच दिवाळीला तरी दोष कशाला द्यावा..

मेधा, चित्रा आज काहीतरी गोडाचे होऊन जाऊ दे बरं..

आत्ता या क्षणी सगळेच एका सुंदर फॅमिली फोटो मध्ये पोज घेऊन असल्यासारखे दिसत होते....

अगदी दिवाळीच्या जाहिरातींमध्ये असतात ना तसेच.......

समाप्त.

हे सर्वव्यापी परमेश्वरा ,

तू आम्हाला नुसते जीवनच दिले नाही तर ते आनंदाने व्यतीत करण्याचे गुपित पण या जीवना बरोबर दिले ..पण ते उलगडणे मात्र अवघड केलेस ...की आम्हीच ते अवघड करून ठेवले ....??

खरंतर ...तुझीच कृपा पाहिजे हे जीवनाचे कोडे सोपे करायला ...

ज्याला ती कृपा जाणवली त्याचा मार्ग सुकर झाला ...